
वेडा बाळू
निरंजन कुलकर्णी

# वेडा बाळू

## निरंजन कुलकर्णी

ई साहित्य प्रतिष्ठान

# वेडा बाळू

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

वेडा बाळू (कथासंग्रह)

निरंजन कुलकर्णी

Flat No-102, Pandurang Residency, near OYO Twin tower,

Laxmi Chowk, Hinjewadi, 411057

Mobile No- 7020046267

Email id – kulkarni.niranjan01@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ११ मे २०२०

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.
- ©esahity Pratishthan®2020





माझं नाव निरंजन प्राणेश कुलकर्णी. व्यवसायाने मी चार्टर्ड अकौंटंट आहे. मला वाचनाची तसेच फोटोग्राफीची आवड आहे. फोटोग्राफी म्हटलं की फिरणं आलंच. त्यामुळे मला फिरायला देखील खूप आवडतं. तसं तर मी सगळ्याच प्रकारचं साहित्य वाचतो. मग ते ऐतिहासिक असो किंवा प्रवासवर्णन असो. पण मला गुढकथा आणि भयकथा सर्वात जास्त आवडतात. आवड्ते लेखक म्हणाल तर बरेच आहेत. पण त्यातही नारायण धारप, रत्नाकर मतकरी, सुहास शिरवळकर आणि जी. ए कुलकर्णी हे माझे सर्वात जास्त आवडते लेखक आहेत. या सर्व दिग्गजांच्या कथा – कादंबऱ्या वाचता वाचता आपणही थोडफार लिहू शकतो असं मला जाणवलं आणि आत्तापर्यंत वाचलेल्या साहित्यातून प्रेरणा घेऊन मी माझ्या लेखन प्रवासाला सुरुवात केली. आत्तापर्यंत मी तीन दीर्घकथा तसेच काही लघुकथा लिहिल्या आहेत. यापूर्वी माझ्या तीन कथा 'शापित कॅमेरा', 'मोठ्या मनाचा माणूस' व 'चांदणी रात्र' इ – साहित्य वर प्रकाशित झाल्या आहेत. इ – साहित्यसारखं व्यासपीठ माझ्यासारख्या नवोदित लेखकांसाठी पर्वणीच आहे. त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल तसेच माझ्या कथा तुमच्यासारख्या उत्साही वाचकांपर्यंत पोहोचवल्याबद्दल इ – साहित्यचे मन:पूर्वक आभार.

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chaandani_ratra_niranjan_kulkarni.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/shapeet_camera_niranjan_kulkarni.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mothya_manacha_manus_niranjan_kulkarni.pdf






ज्यांनी डोक्यात विचारांचं थैमान घालून

सलग तीन रात्री माझ्या झोपेचं खोबरं केलं

त्या रावसाहेब, बकुळा व बाळूस अर्पण

कथानुक्रम

वेडा बाळू

कर्मबंध

पिवळा रंग

इच्छा

या कथांमधील सर्व पात्रे, स्थळे व घटना काल्पनिक आहेत. जर चुकून याचा कुठे साम्य आढळून आलाच तर तो निव्वळ योगायोग समजावा. यात कुणाच्या भावना दुखावण्याचा कोणताही उद्देश नाहीच .

निरंजन कुलकर्णी

# वेडा बाळू

कोंबडा अरवला तसा वेडा बाळू खडबडून जागा झाला. त्याने घाईगडबडीत सदरा अंगावर चढवला, खालची सतरंजी गुंडाळली व तो धावतच स्वयंपाकघरात गेला. त्याने गॅसवर दुधाचं पातेलं ठेवलं व एका बाजूला चहा बनवण्यासाठी एका पातेल्यात पाणी उकळायला ठेवलं. चहा तयार होताच त्याने तो कपात ओतला व कप घेऊन तो थेट व्हरांड्यात आला. पण रावसाहेब तिथे नव्हते. इतक्या वर्षात असं पहिल्यांदाच घडत होतं. बाळू अंगणात गेला पण तिथेही रावसाहेब दिसत नव्हते. बाळू पुन्हा वाड्यात आला. तो थेट रावसाहेबांच्या खोलीपाशी आला. आतून घोरायचा आवाज येत होता. बाळूने हळूच खोलीचा दरवाजा सरकवला. आत बेडवर रावसाहेब गाढ झोपले होते. बाळूने दरवाजा पूर्ण उघडला व तो हळूच आत गेला. आज पहिल्यांदाच तो रावसाहेबांच्या खोलीत आला होता. समोरच्या भिंतीवर एक पेंटिंग लावलं होतं. ते एका नर्तकीचं पेंटिंग होतं. एवढी सुंदर बाई त्याने स्वप्नात देखील कधी पाहिली नव्हती. जवळून पाहण्यासाठी तो अजून पुढे गेला पण वाटेत ठेवलेल्या पाण्याच्या तांब्याला त्याचा पाय लागला व तांब्या घरंगळत जाऊन समोरच्या भिंतीला टेकला. त्या आवाजाने रावसाहेब खडबडून जागे झाले. त्यांनी डोळे उघडताच समोर वेडा बाळू उभा. तो अजूनही त्या भिंतीवरील चित्राकडे पाहत होता. बाळूला आपल्या खोलीत आलेला पाहून रावसाहेब संतापले व बाळूवर ओरडले – "गाढवा, निघ इथून आणि माझा चहा आण." रावसाहेबांचा ढगांच्या गडगडाटासारखा आवाज ऐकताच बाळू भानावर आला व तिथून पळाला.

काही क्षणातच तो चहाचा कप घेऊन आला व रावसाहेबांच्या खोलीच्या दारात आत पाहत उभा राहिला. दारात उभ्या बाळूकडे पाहून रावसाहेब नेहमीप्रमाणे खेकसले – "पाहतोस काय असा वेड्यासारखा. तो चहा टेबलावर ठेव अन निघ इथून." एवढा ओरडा खाऊनसुद्धा बाळूच्या चेहऱ्यावरचं गबाळं हसू तसुभरदेखील कमी झालं नाही. त्याने चहाचा

कप टेबलावर ठेवला व तिथून निसटला. काही क्षणातच रावसाहेबांनी त्याला बोलावलं व तो समोर दिसताच ते पुन्हा खेकसले – “बेअक्कल आहेस का? चहा गरम द्यायचा असतो एवढी सुद्धा अक्कल नाही का तुला?” पुढचं ऐकायला बाळू तिथे थांबलाच नाही. तो थेट स्वयंपाकघरात पळाला. थोड्याच वेळात तो हातात गरम चहाचा कप घेऊन आला व त्याने कप टेबलवर ठेवला. बाळू रावसाहेबांकडे पाहत वेड्यासारखं हसत उभा राहिला. रावसाहेबांनी चहाचा कप हातात घेतला व ते पुन्हा बाळूवर गरजले – “असा वेड्यासारखा काय बघतोयस? जा गोठ्यात जाऊन शेण गोळा करून आण.”

रावसाहेबांचं डोकं प्रचंड ठणकत होतं. चहाचा घोट पोटात गेल्यावर त्यांना जरा बरं वाटलं. पण राहून राहून एकच विचार त्यांच्या मनात येत होता. ‘आपल्याला नेहेमीच्या वेळेला जाग कशी नाही आली?’ गेल्या दहा वर्षात कोंबडा अरवला आणि रावसाहेब झोपेतून उठले नाहीत असं कधीच झालं नव्हतं. आता आपलं वय झालंय याची त्यांना जाणीव झाली. त्यांनी चहा संपवला, प्रातर्विधी उरकून गावात फेरफटका मारण्यासाठी ते वाडयाबाहेर आले.

रावसाहेब गावातलं भारदस्त व्यक्तिमत्व होतं. त्यांच्या तापट, संतापी स्वभावामूळे गावातील लोक त्यांच्यापासून चार हात लांबच रहायचे. हा वाडा रावसाहेबांच्या आजोबांनी बांधला होता. ते गावाचे सरपंच होते. त्या काळी एखाद्या राजासारखा त्यांचा थाट होता. वडिलोपार्जित शेती होती. गोठ्यात गुराढोरांची रांगचरांग असायची. वाड्यात गाडीमाणसांचा राबता असायचा. त्यांच्या शब्दाला गावात मान होता. त्यांची बायको फार लहानवयात वारली पण त्यांनी पत्नीच्या निधनानंतर पुन्हा लग्न केलं नाही. त्यांचा मुलगा मात्र अतिशय नालायक निघाला. त्यांच्या निधनानंतर घराण्याला उतरती कळा आली. त्यांच्या जुगारी आणि व्यसनी मुलाने सर्व काही घालवलं. खरंतर रावसाहेबांच्या मामाने त्यांच्या वडिलांना लुबाडले. रावसाहेब मात्र पहिल्यापासूनच अतिशय मेहनती आणि शिस्तप्रिय होते. त्यांचं आपल्या वडिलांशी कधी पटलंच नाही. आईचे मात्र ते फार लाडके होते. मिलीटरीत जाऊन देशसेवा करायची हे त्यांचं

लहानपणापासूनचं स्वप्न होतं व ते त्यांनी पूर्णही केलं. त्यांचं सारं शिक्षण गावातच झालं. त्यानंतर ते आर्मीत भरती झाले. त्यांच्या हुषारीमुळे व शिस्तप्रिय स्वभावामुळे खूप कमी वेळात त्यांना बढती मिळत गेली. शेवटी ब्रिगेडियर पदावर असताना ते निवृत्त झाले. निवृत्त होऊन आता त्यांना दहा वर्ष झाली होती. तेव्हापासून ते वाड्यावरच रहात होते.

वाड्यात रावसाहेब एकटेच रहात होते. अर्थात सोबतीला बाळू होताच. रावसाहेबांच्या तापट स्वभावामुळे कोणताच नोकर वाड्यावर फार काळ टिकत नसे. एक दिवस त्यांचा एक मित्र बाळूला त्यांच्याकडे घेऊन आला. साधारण चाळीसच्या आतबाहेर वय, दाढीचे खुंट, चेहऱ्यावर आणि डोळ्यांत एक हलकीशी वेडाची झाक आणि आत्मविश्वास नसलेल्या तरुणांत एक प्रकारचे पाठीला जे पोक असते तसा तो, बारकुटा बाळू. "थोडा वेडसर आहे; पण सगळ्या प्रकारची कामे करतो. स्वयंपाक तर अतिशय सुंदर बनवतो. माझ्याकडे दोन वर्ष कामाला होता. पण आता मीच मुंबईला माझ्या मुलाकडे रहायला चाललोय. म्हणून याला तुमच्याकडे घेऊन आलो" एवढे बोलून बाळूला रावसाहेबांच्या ताब्यात देऊन मित्र गेला. बाळूचं गबाळं रूप पाहून, त्याच्या चेहेऱ्यावरचं ते वेडगळ हसू पाहून हा काही काम करू शकेल असं रावसाहेबांना बिलकुल वाटलं नव्हतं. पण काही दिवसातच बाळूने त्यांचा समज चुकीचा ठरवला. काहीवेळा सांगितलेलं काम विसरायचा पण त्याने कामचुकारपणा कधीच केला नाही आणि मुख्य म्हणजे रावसाहेबांच्या शिव्या गपगुमान ऐकून घ्यायचा आणि तेही अगदी हसतमुखाने. बाळूला वाड्यावर येऊन आता जवळपास सहा वर्ष झाली होती. बाळू जेव्हा पहिल्यांदा वाड्यात आला तेव्हा त्याने कुत्र्याचं एक पिल्लुही सोबत आणलं होतं. त्या पिल्लाला बाळूने "शेरु" असं नावही दिलं होतं. बाळू रोज चहा, जेवण बनवण्यापासून ते अगदी शेणाने अंगण सारवण्यापर्यंत सगळी कामं करायचा. कामं संपल्यावर जेव्हा त्याला मोकळा वेळ मिळायचा तेव्हा तो शेरुशी खेळायचा. शेरु आता चांगलाच दांडगा झाला होता पण अजूनही "शशशश्शेरू...." अशी बाळूची हाक ऐकताच शेरु शेपटी हलवायचा. बाळू बोलताना फार अडखळायचा. बाळू जेव्हा गावात आला तेव्हा गावातल्या उनाड मुलांना एक नवीन विषय

मिळाला होता. बाळूचं गबाळं रूप, त्याच्या चेहऱ्यावरचं वेडगळ हास्य, त्याचं अडखळत बोलणं हा या उनाड मुलांसाठी चेष्टेचा विषय होता. बाळू रस्त्यावरून जात असला की ही मुलं त्याच्या मागे "वेडा बाळू, वेडा बाळू" असं ओरडत फिरायची. मधूनच एखादं आगाऊ पोरगं बाळूवर दगड फेकायचं. दगड लागताच बाळू "आई ग......" असं म्हणून कळवळायचा. त्याचं हे कळवळणं पाहून ती मुलं फिदीफिदी हसायची. बाळूने मात्र कधी त्या वात्रट मुलांकडे लक्ष दिलं नाही. काहीही झालं तरी त्याच्या चेहेऱ्यावरचं वेडगळ हास्य कायम असायचं.

बाळूच्या भूतकाळाबद्दल आणि खास करून बाळूचा वेडा बाळू कसा झाला याबद्दलच्या अनेक कथा गावात प्रचलित होत्या. कोणी म्हणत त्याच्या वडिलांनी तो लहान असताना दारुच्या नशेत त्याच्या डोक्यात काठी हाणली त्यामुळे त्याच्या डोक्यावर परिणाम झाला, कोणी म्हणे त्याचं एका मुलीवर एकतर्फी प्रेम होतं त्या मुलीने नकार दिला त्यामुळे तो वेडा झाला, कोणी म्हणे बाळू शाळेत असताना फार हुशार होता पण त्याला अचानक जोराचा ताप आला व तापामुळे त्याच्या डोक्यावर परिणाम झाला. अशा बऱ्याच कथा गावातील लोक सांगत पण नक्की खरं काय आहे ते कळायला मार्ग नव्हता कारण स्वतः बाळूला जर कोणी हा प्रश्न विचारला तर तो नेहमीप्रमाणे वेडगळ असत "म्ममाहित नननाय..." हे एकच उत्तर देई.

रात्रीचं जेवण झाल्यावर रावसाहेब बाहेर शतपावली मारून आले व त्यांच्या खोलीत जाऊन अंथरुणावर आडवे झाले. त्यांचं लक्ष समोरच्या टेबलावरच्या चहाने भरलेल्या कपाकडे गेलं आणि ते कडाडले. त्यांचा आवाज ऐकताच बाळू धावत आला. सकाळी आणलेला चहाचा कप परत न्यायला तो विसरला होता. रावसाहेब पुन्हा कडाडले – "हा कप काय तुझा बाप उचलणार का?" बाळूने झटपट कप उचलला व तो तिथून निघाला. बाळू जाताच रावसाहेबांचं लक्ष समोरच्या भिंतीवर लावलेल्या चित्राकडे गेलं आणि त्यांच्या मनात जुन्या आठवणी जाग्या झाल्या.

रावसाहेबांची आर्मीत भरती झाली आणि त्यांना काश्मीरला पोस्टिंग मिळालं. एक वर्ष ड्युटी केल्यावर त्यांना दोन महिन्यांची सुट्टी मिळाली आणि ते गावी परत आले. गावात येताच त्यांचं जोरदार स्वागत झालं. दुसऱ्याच दिवशी रावसाहेबांभोवती मित्रांचा गराडा पडला. रात्री सर्व मित्र वडाच्या झाडाखाली पारावर जमले. सर्वात मधोमध रावसाहेब बसले होते. ते मिलिटरीतले अनुभव अगदी रंगवून सांगत होते व त्यांचे मित्रदेखिल अगदी तल्लीन होऊन ऐकत होते. अचानक रावसाहेब बोलायचे थांबले. समोरच्या रस्त्यावरून जाणाऱ्या मुलींनी त्यांचं लक्ष वेधलं होतं. खासकरून पिवळ्या रंगाची साडी नेसलेल्या मुलीवरून तर त्यांची नजरच हटत नव्हती. ती मुलगीही रावसाहेबांकडे पाहून खट्याळ हसली. रावसाहेब बोलायचे थांबताच सगळे मागे वळून पाहू लागले आणि काय चालू आहे ते त्यांना समजलं. तसा एकजण मुद्दामच म्हणाला, "रावसाहेब तुम्ही काहीतरी सांगत होतात ना!" त्याच्या आवाजाने रावसाहेब भानावर आले आणि काही झालंच नाही अशा आवेशात ते पुन्हा बोलू लागले.

दुसऱ्या दिवशी रात्री रावसाहेबांचा एक मित्र वाड्यावर आला. त्याने आपल्याला एका ठिकाणी जायचे आहे तेव्हा लवकर आवर असे रावसाहेबांना सांगितले. कुठे जायचंय असं रावसाहेबांनी त्याला विचारलं पण तो सांगायला तयार नव्हता. सुरुवातीला "कुठे जायचंय सांग त्याशिवाय मी येणार नाही" असं म्हणत रावसाहेब हटून बसले होते पण मित्राच्या आग्रहासमोर शेवटी त्यांनी हार मानली. ते दोघे वाड्यातून बाहेर पडले. रावसाहेब मित्राच्या मागून चालत होते. थोड्यावेळाने ते एका मोठ्या तंबूपाशी पोहोचले. तो तमाशाच्या फडाचा तंबू पाहून रावसाहेब चांगलेच संतापले. "तुला माहितीये ना असल्या फालतु गोष्टीत मला रस नाही. तरीही तू मला इथे घेऊन आलास!" मित्राचं रावसाहेबांच्या बोलण्याकडे लक्षच नव्हतं. त्याने ओढतच रावसाहेबांना तंबूत आणलं. त्यांची किरकिर अजूनही सुरूच होती. तंबूत चांगलीच गर्दी जमली होती. समोर लाकडाच्या फळ्या जोडून मंच बनवला होता. लोकांचा नुसता गोंधळ चालला होता. अगदी तरुण मुलांपासून म्हाताऱ्यांपर्यंत अनेक माणसं तमाशा बघायला आली होती. चंदनबाई कधी एकदा मंचावर येतेय याची सगळे वाट पाहत होते. आता तुंतुण्याचे स्वर वाजू

लागले तसे लोक शांत झाले. आता एकेक करत बायका मांचावर येऊ लागल्या. सगळ्यात शेवटी चंदनबाई मंचावर आली. तिने मंचावर येताच खाली वाकून मंचाला नमस्कार केला तसा सगळ्यांनी एकच गलका केला. रसिकांच्या शिट्टी आणि आरोळ्यांनी तंबू दणाणला. रावसाहेबांनी समोर पाहिलं. सर्वात मागे उभ्या असलेल्या एका तरुण मुलीकडे त्यांची नजर जाताच त्यांचा चेहेरा खुलला. काल रात्री जिच्याशी त्यांचा नजरेचा खेळ चालला होता तीच मुलगी समोर उभी होती. तिला पाहताच रावसाहेबांच्या मनातली नाराजी कुठल्याकुठे पळाली होती.

आता नाच-गाण्याला सुरुवात झाली होती. चंदनबाई स्वतःच गात होती. तिचा आवाज फारच मधाळ होता. तिचा कटाक्ष आपल्यावर एकदातरी पडावा या साठी लोकं धडपडत होती. रावसाहेबांची नजर मात्र अजूनही त्या मुलीवरच खिळली होती. ती बेभान होऊन नाचत होती. तिने जेव्हा रावसाहेबांना आपल्याकडे पाहताना पाहिलं तेव्हा ती चक्क लाजली. त्या दोघांच्या नजरेचा खेळ पुन्हा सुरू झाला.

एकदाचा तमाशा संपला. एकेक करत सर्व बायका, मुली मंचाच्या मागे गेल्या. लोकांची गर्दीही पांगली. रावसाहेब आणि त्यांचा मित्रही तिथून निघाले. ती मुलगी काहिकेल्या रावसाहेबांच्या नजरेसमोरून जात नव्हती.

“काय रावसाहेब, कशी वाटली चंदनबाई? फटाका आहे ना?” मित्राने विचारलं.

रावसाहेबांनी मित्राच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून त्यालाच उलट प्रश्न विचारला, “गज्या, त्या लाल साडी नेसलेल्या मुलीचं नाव काय रे?”

गज्याला हा प्रश्न अपेक्षित नव्हता. तो म्हणाला, “निम्या बायांनी लाल साडी नेसली होती. तू नक्की कोणाबद्दल बोलतोयस?”

“अरे ती रे, ती डाव्या बाजूच्या कोपऱ्यात उभी होती बघ?” रावसाहेब अगदी उत्साहात म्हणाले.

“अच्छा, बकुळा होय! तुझ्या मनात भरली वाटतं!” गज्या मिश्कीलपणे हसत म्हणाला.

“तसं काही नाही रे. पण फार छान नाचते.” रावसाहेब साळसूदपणाचा आव आणून म्हणाले.

“तुला भेटायचं असेल तर सांग मला चांगली ओळखते ती.”

हे ऐकताच रावसाहेबांच्या कपाळावर आट्या चढल्या. त्यांच्या मनातील शंका गज्याने ओळखली व तो म्हणाला, “ओळखते म्हणजे आमच्यात तसं काही नाही. ती काळजी तू करून नकोस.”

“अरे तुमच्यात तसं काही असलं जरी तरी मला त्याचं काय. मला फक्त तिचा नाच आवडला आणि म्हणून तिला एकदा प्रत्यक्ष भेटून तिचं कौतुक करायचं आहे एवढंच.” रावसाहेब म्हणाले.

रावसाहेब कितीही लपवायचा प्रयत्न करत असले तरीही त्यांचा चेहेराच सर्वकाही सांगत होता. त्यांच्या मनात काय चालू आहे ते गज्याला समजलं तो “चल मग आत्ताच भेटुयात तिला” असे म्हणाला आणि दोघेही आलेल्या वाटेने परत फडाच्या दिशेने चालू लागले.

थोड्याच वेळात दोघे फडापाशी पोहोचले. तंबू आता पूर्ण रिकामा होता. तंबूच्या मागच्या बाजूला बरेच लहान तंबू होते. एका तंबूच्या दारात चंदनबाई हातात तंबाखू मळत उभी होती. दोघांना तिथे पाहताच तिने विचारलं, “हिकडं काय काम हाय आता. तमाशा कवाच संपला की!”

“बकुळाला भेटायचं होतं.” गज्या धीटपणे म्हणाला.

“बकुळाला? अन ते कशापायी?” चंदनबाईने थोडं रागातच विचारलं.

“हा माझा मित्र रावसाहेब. ह्याचं बकुळाकडे जरा काम आहे.”

चंदनबाईने रावसाहेबांकडे पाहिलं व ती म्हणाली, “तुम्ही ते मिल्ट्रीवाले ना?”

रावसाहेबांनी होय म्हणताच तिने बकुळाला हाक दिली. तशी बकुळा तंबूतून बाहेर आली. “खास तुला भेटाया आल्यात. बघ काय म्हनत्यात.” एवढं बोलून चंदनबाई तिच्या तंबूत गेली.

“बोला की?” बकुळा रावसाहेबांच्या डोळ्यात डोळे घालून अतिशय धीटपणे म्हणाली.

रावसाहेबांना सुरुवात कुठून करावी तेच कळत नव्हतं. ते काहीच बोलेनात हे पाहून शेवटी गज्या म्हणाला, “हा माझा मित्र रावसाहेब. आज आम्ही तुमचा तमाशा बघितला. याला तुझा नाच खूप आवडला ते सांगायला तो इथे आला आहे.”

हे ऐकून बकुळा म्हणाली, “हे तू कशापायी सांगतूस. तुझ्या मित्राला बोलाय तोंड नाय का? अन काय हो रावसाहेब तुमास्नी फकस्त माझा डॅन्स आवडला, मी न्हाई आवडले व्हय.”

हे ऐकून गज्या आणि रावसाहेब दोघेही एकदम हबकले. स्वतःला कसंबसं सावरून रावसाहेब म्हणाले, “तसं काही नाही. तुम्ही दिसता पण खूप छान.” रावसाहेब एवढं बोलले खरे पण आपण हे कसं काय बोललो हे त्यांचं त्यांनाच कळत नव्हतं. गज्या तर नुसता आश्चर्यचकित होऊन पाहत होता. रावसाहेब असं काहीतरी बोलतील याची त्यालाही कल्पना नव्हती.

पण खरा धक्का तर बकुळाने दिला. ती म्हणाली, “मी तुमास्नी कालच्या रातीला जवा बघितलं तवाच तुमी मला आवडला हुता.” या मुलीला कसली भिडभाडच नव्हती. एवढं बोलून ती तंबूत पळाली. परतीच्या वाटेवर दोघही शांतपणे चालले होते. कोणीच कुणाशी बोलत नव्हतं. रावसाहेबांचं मन पूर्णपणे बकुळामय झालं होतं. एवढी धाडशी आणि स्पष्ट बोलणारी

मुलगी त्यांनी यापूर्वी कधीच पाहिली नव्हती. तिच्यातली एक गोष्ट त्यांना सर्वात जास्त भावली होती. तिच्या बोलण्या वागण्यात एक प्रकारचा निरागसपणा होता.

रावसाहेब आणि बकुळा यांच्या भेटीगाठी आता वाढल्या होत्या. त्यांच्यातल्या प्रेमाने परिसीमा गाठली होती. त्यांच्या संबंधाची चर्चा आता गावभर झाली होती. पाहता पाहता दोन महिने संपले. रावसाहेबांनी बकुळाची शेवटची भेट घेतली आणि ते परत काश्मीरला जायला निघाले. काश्मीरला पोहोचताच रावसाहेबांची ड्युटी पुन्हा सुरू झाली. पण अजूनही बकुळा काहिकेल्या त्यांच्या डोक्यातून जात नव्हती. आता त्या दोघांमध्ये पत्रांद्वारे संवाद सरु झाला होता. बकुळाला लिहिता वाचता येत नव्हतं त्यामुळे गज्या तिला रावसाहेबांची पत्र वाचून दाखवी. तसेच ती तिच्या मनातील भावना गज्याला सांगायची व गज्या त्या पत्रात लिहून पत्र रावसाहेबांना पाठवायचा.

हे असं कित्येक महिने चालू होतं. एकदाची ड्युटी संपली आणि रावसाहेब गावी आले. त्यांनी गज्याकडे बकुळाची चौकशी केली तेव्हा तमाशाचा फड आता जवळच्याच एका गावात हालल्याचं गज्याने त्यांना सांगितलं. एक दिवस रावसाहेब बकुळाला भेटायसाठी त्या गावात गेले. गज्याही त्यांच्या सोबत होता. ते दोघे फडापाशी पोहोचले. रावसाहेबांनी तिथल्याच एका बाईकडे बकुळाची चौकशी केली तेव्हा तिने बकुळा कपडे धुण्यासाठी नदीकाठी गेल्याचं सांगितलं. थोड्याच वेळात ते नदीपाशी पोहोचले. समोर बकुळाला पाहताच रावसाहेब धावतच तिच्यापाशी गेले. दोघांची नजरानजर झाली आणि काही बोलायच्या आतच रावसाहेबांनी बकुळाला मिठीत घेतलं. गज्या समोर उभा आहे याचंही त्यांना भान राहिलं नव्हतं.

रावसाहेब आणि बकुळाच्या गाठी भेटी पुन्हा सुरू झाल्या. गावात पुन्हा चर्चा सुरू झाली. ही चर्चा रावसाहेबांच्या आई-वडिलांच्या कानावर गेली होती.

एक दिवस रावसाहेबांच्या वडिलांनी त्यांना बोलावलं. “मी काय ऐकतोय ते खरं आहे का?” त्यांनी रावसाहेबांना विचारलं.

“तुम्ही बकुळाबद्दल बोलताय ना?” रावसाहेब न बिचकता बोलले.

“हे सगळं बंद कर. माझ्या पाहण्यात तुझ्यासाठी खूप सुंदर आणि सुशील मुली आहेत. तुझं लग्न लावायचं मी ठरवलं आहे. तेव्हा हे सगळे चाळे बंद कर. आधीच गावात चर्चा सुरू आहे.” रावसाहेबांचे वडील म्हणाले.

‘चाळे’ हा शब्द ऐकताच रावसाहेब चांगलेच संतापले होते पण कसंबस स्वतःला शांत करत ते अतिशय खंबीर आणि स्पष्टपणे म्हणाले, “मी बकुळाशी लग्न करणार आहे.” हे ऐकताच वडिलांच्या पायाखालची जमीनच सरकली. संतापामुळे त्यांचं सारं शरीर थरथरत होत. बराचवेळ त्यांनी आपल्या मुलाच्या नावाचा उद्धार केला, त्याला शिव्यांची लाखोली वाहिली. रावसाहेबांनी अतिशय शांतपणे सर्व ऐकून घेतलं व ते खोलीतून बाहेर आले. दुसऱ्या दिवशी रावसाहेबांच्या आईनेही त्यांची समजूत काढायचा खूप प्रयत्न केला पण त्यांना आता बकुळा सोडून दुसरं काहीच दिसत नव्हतं. शेवटी आईनेही हार मानली.

दुसऱ्या दिवशी सकाळी रावसाहेब फडावर गेले. बकुळाला त्यांनी बाहेर बोलावलं. दोघेही नदीच्या काठावर गेले.

“आपण लग्न करूयात.” रावसाहेब बकुळाला म्हणाले.

हे ऐकून बकुळा थोडी गोंधळली. तिचं रावसाहेबांवर खरोखरच फार प्रेम होतं. पण ती ज्या समाजात ज्या वातावरणात वाढली होती तिथे लग्न, संसार यासारख्या गोष्टींना थारा नव्हता. लग्न करतात म्हणजे नक्की काय करतात याची तिला कल्पनादेखील नव्हती. एकमेकांवर भरभरून प्रेम करायचं एवढंच तिला कळत होतं.

ती काहीच बोलत नाही हे पाहून रावसाहेब वैतागले. डोळ्यात पाणी आणून ते म्हणाले, “तुला समजत कसं नाही बकुळा. मी नाही जगू शकणार तुझ्याशिवाय!”

त्यावर बकुळा म्हणाली, “तुमी म्हनता ते बराबर हाय. पन माझं तुम्हावर लै परेम हाय अन तुमचं बी माझावर लै परेम हाय, मंग लग्नाची काय गरज हाय?”

आता रावसाहेब थोडे शांत झाले होते. त्यांना बकुळाच्या मनातली शंका समजली होती. ते म्हणाले, “हे बघ बकुळा. गावात तुला माझी रखेल म्हणून तुझी हेटाळणी करणारे लोक खूप आहेत. आपलं लग्न झालं तर सगळ्यांची तोंडं बंद होतील आणि तुझ्यासाठी मी माझी मिलीट्रीची नोकरी सोडायलाही तयार आहे. तेव्हा तू फक्त हो म्हण.” शेवटी बकुळा लग्नाला तयार झाली. ते दोघे गावातून पळून जाणार होते. मुंबईला जाऊन रावसाहेब नोकरी शोधणार होते.

रात्रीचे बारा वाजले होते. ठरल्याप्रमाणे रावसाहेबांनी मोजकं सामान बरोबर घेतलं. गज्या वाड्याच्या दारात आधीच येऊन थांबला होता. रावसाहेबांनी सामान गाडीत मागच्या सीटवर ठेवलं व ते गज्याच्या बाजूला बसले. थोड्याच वेळात ते फडाच्या ठिकाणी पोहोचले आणि समोरचं दृश्य पाहून रावसाहेबांना धक्काच बसला. समोरचं मैदान पूर्ण मोकळं होतं. रावसाहेबांचं अवसान गळालं आणि ते डोकं हातात धरून बाजूच्या खडकावर बसले. आता सगळं संपलं होतं. गज्या त्यांची समजूत काढण्याचा खूप प्रयत्न करत होता पण त्याचे शब्द रावसाहेबांपर्यंत जणू पोहोचतच नव्हते. गज्याने गाडीतला टॉर्च घेतला आणि तो नदीच्या दिशेने जाऊ लागला. कदाचित कोणीतरी भेटेल अशी त्याला आशा होती. नदीकडे जाताना टॉर्चच्या उजेडात काहीतरी चमकल्यासारखं त्याला दिसलं. त्याने जवळ जाऊन पाहिलं व चमकणारी वस्तू उचलली. तो बकुळाचा फोटो होता. गज्या धावतच रावसाहेबांपाशी गेला आणि त्याने तो

फोटो रावसाहेबांच्या हातात दिला. रावसाहेबांनी त्या फोटोकडे पाहिले आणि त्यांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. तो फोटो त्यांनी शर्टाच्या खिशात ठेवला व ते तिथून निघाले.

त्या घटनेपासून रावसाहेब पूर्णपणे बदलले. ते कोणाशीच बोलत नव्हते. त्यांना वाड्याबाहेर पडून देखील आता बरेच दिवस झाले होते. त्यांच्या आईनेही त्यांना समजावण्याचा खूप प्रयत्न केला पण ती काही बोलली की ते तिच्याच अंगावर खेकसायचे. त्यांचा स्वभाव दिवसेंदिवस जास्तच चिडचीडा होत होता. आता परत ड्युटीवर जायची वेळ आली होती. ते परत जातील असं कुणालाच वाटत नव्हतं पण सर्वांचाच समज चुकीचा ठरवत ते ठरलेल्या दिवशी काश्मीरला जायला गावातून बाहेर पडले. आता ते गावाला कायमचेच दुरावले होते. इतक्या वर्षात ते एकदाही गावात आले नाहीत. आले ते सैन्यातून निवृत्त झाल्यावर. वाड्यात येताच सर्वात पहिलं त्यांनी ते पेंटिंग भिंतीवर लावलं. ते पेंटिंग त्यांनी मुंबईच्या एका प्रसिद्ध चित्रकाराकडून बनवून घेतलं होतं. बकुळाचा फोटोही त्यांनी अजूनही जपून ठेवला होता.

xxxxxxxxxxxxxxxxxx

त्या रात्री रावसाहेबांना झोपच लागली नाही. मनात बकुळाच्या आठवणींचा पूर आला होता. त्यांनी घड्याळात पाहिले. सकाळचे आठ वाजून गेले होते. बाळूदेखील गाढ झोपला होता. ती पेंटिंगमधली बाई त्याच्या स्वप्नात आली होती. ती बिछान्यावर पहुडली होती व बाळूकडे लडिवाळ हसत पाहत होती आणि बाळू एकेक पाऊल टाकत तिच्या जवळ जात होता. आता बाळू तिच्या अगदी जवळ आला होता इतक्यात त्याच्या पाठीत वेदना उसळली

व पाठोपाठ रावसाहेबांचे तिखट शब्द त्याच्या कानावर आदळले. “भाऽऽऽऽऽडया उठोतोस की हणू अजून एक लाथ पाठीत!” रावसाहेब कडाडले, तसा बाळू पाठ चोळतच उठला व थेट स्वयंपाकघरात गेला व पाचच मिनिटात हातात चहाचा कप घेऊन आला. चहा पिल्यावर रावसाहेबांना जरा बरं वाटलं.

रावसाहेबांच्या मनावर बकुळाने पूर्णपणे कब्जा केला होता. कित्येक दिवस त्यांना रात्री झोपच लागत नव्हती. रोज वेगवेगळी स्वप्न पडायची आणि मध्यरात्री अचानक जाग यायची. सगळ्या स्वप्नातला विषय एकच असायचा – बकुळा. सतत होणाऱ्या जागरणामुळे त्यांची तब्येत खालावली होती. आता त्यांना डॉक्टरांकडे जाण्यावाचून पर्याय नव्हता. इतक्या वर्षात सर्दी-खोकला सोडून त्यांना कसलाही आजार झाला नव्हता. पण हे काहीतरी भलतंच होतं.

रावसाहेब तालुक्याच्या दवाखान्यात पोहोचले. त्यांनी डॉक्टरांना रोज रात्री पडणाऱ्या स्वप्नांबद्दल सांगितलं, अर्थातच बकुळाचा उल्लेख न करता. डॉक्टरांनी त्यांना झोप लागण्यासाठी काही गोळ्या लिहून दिल्या व थोडे दिवस या गोळ्या घेऊन बघा तरीही उपयोग नाही झाला तर मात्र तुम्हाला मानसोपचार तज्ज्ञाकडे जावं लागेल असं डॉक्टर रावसाहेबांना म्हणाले. औषधांचा योग्य तो परिणाम होत होता. आता स्वप्नं पडायची थांबली होती व गाढ झोपही लागत होती. रावसाहेबांची तब्येतही आता बऱ्यापैकी सुधारली होती.

एक दिवस रावसाहेब व्हरांड्यातल्या खुर्चीत बसले होते. त्यांच्या एका हातात वर्तमानपत्र तर दुसऱ्या हातात चहाचा कप होता. त्यांना कसलातरी आवाज ऐकू आला म्हणून त्यांनी समोर पाहिलं. समोरून एक स्त्री चालत येत होती. त्या स्त्रीने अंगणात प्रवेश केला व ती थेट

वाड्याच्या दरवाजापाशी येऊन आत पाहू लागली. तिला पाहताच रावसाहेबांच्या हातातून वर्तमानपत्र निसटलं. दुसऱ्या हातातला चाहाचा कपही निसटून खाली जमिनीवर आपटून फुटला व कपातला चहा थेट दरवाजापर्यंत वाहत जाऊन त्या स्त्रीच्या पायांना टेकला. गरम चहाचा पायांना स्पर्श होताच तिने पाय झटकला. रावसाहेबांचा त्यांच्या डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता. समोर बकुळा उभी होती ती सुद्धा जशी त्यांनी शेवटचं तिला पाहिलं होतं अगदी तशीच्या तशी. तिला पाहताच त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. थरथरत्या हाताने त्यांनी डोळे पुसले.

"मला आत बोलवनारे का हितच उभी करनार?" बकुळा ठसक्यात थोड्या लटक्या रागात म्हणाली.

"ये ना." रावसाहेब कसेबसे म्हणाले. बकुळा आत येताच रावसाहेबांच्या बाजूला खुर्चीवर बसली.

रावसाहेब अजूनही धक्क्यातून बाहेर आले नव्हते. एका बाजूला त्यांना बकुळाला पाहून प्रचंड आनंद झाला होता पण तितकंच आश्चर्यही वाटत होतं.

बराच वेळ झाला तरी ते ते काहीच बोलेनात हे पाहून बकुळाच त्यांना म्हणाली, "तुमी कायच बोलनार नसाल तर मी जाते हितून."

हे ऐकताच रावसाहेब अचानक जागे झाल्यागत म्हणाले, "नाही....नको जाउस तू!" "खरं सांगायचं तर तू परत आलीयेस यावर माझा विश्वासच बसत नाहीये आणि इतक्या वर्षांनंतर देखील तू एवढी तरुण कशी?"

"तुमी मात्र लैच म्हातारं दिसाया लागलाय." बकुळा म्हणाली आणि दोघेही खळखळून हसले. त्यांच्या गप्पा बराच वेळ चालू होत्या. शेवटी बकुळा म्हणाली, "आता मला निघाय पायजे."

“एवढ्यात निघालीस?” रावसाहेब थोड्या नाराजीच्या सुरात म्हणाले.

“उदयाला परत येत्येकी” असं म्हणून बकुळा खुर्चीतून उठली व वाड्याबाहेर पडली. रावसाहेब तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात खुर्चीत बसून राहिले. ते मनाने पुन्हा तरुण झाले होते.

बाळू रावसाहेबांना शोधत व्हरांड्यात आला. अजूनही रावसाहेब खुर्चीत बसले होते. त्यांच्या चेहेऱ्यावरून आनंद ओसंडून वाहत होता. ते स्वतःच्या मनोविश्वात हरवले होते.

“मम्माल्लक जेववववन.” बाळूच्या आवाजाने ते भानावर आले. त्यांनी हातातील घड्याळात पाहिले दुपारचा एक वाजला होता. त्यांनी बाळूच्या हातात पैसे दिले आणि त्याला दुकानातून श्रीखंड आणायला सांगितले.

दुसऱ्या दिवशी सकाळी रावसाहेब नेहमीप्रमाणे व्हरांड्यात चहा पित बसले होते. आजही त्यांच्या हातात वर्तमानपत्र होतं पण त्यांचं सारं लक्ष समोरच्या रस्त्याकडे होतं. बकुळा आज पुन्हा येईल असं त्यांना मनोमन वाटत होतं. तिचीच वाट पाहत ते बसले होते. मात्र त्यांना फार वेळ वाट पहावी लागली नाही. पैंजणाचा आवाज येताच त्यांनी हातातील चहाचा कप खाली ठेवला व ते खुर्चीवरून उठले. समोर दारात बकुळा उभी होती. ती आत येऊन खुर्चीवर बसली. रावसाहेबही बाजूच्या खुर्चीवर बसले. दोघांच्या गप्पा सुरु झाल्या.

अचानक बकुळा म्हणाली, “रावसाहेब एक विचारू का?”

“विचार ना?”

“तुमी लगीन का केलं नाय?”

“तू गेलीस आणि दुसऱ्या कोणा मुलीशी लग्न करायची मला इच्छाच झाली नाही?” रावसाहेब अगदी सहजपणे बोलून गेले.

रस्त्यावरन जाणारे लोक वाड्यापाशी येताच आत डोकावून पाहत होते. व्हरांड्यात खुर्चीवर बसून बाजूच्या रिकाम्या खुर्चीकडे पाहून एकटच बोलणाऱ्या रावसाहेबांना पाहून हसत होते व पुढे जात होते. एक मात्र खरं होतं, रावसाहेबांना इतकं आनांदाने हसताना यापूर्वी कोणीच पाहिलं नव्हतं.

रावसाहेबांना वेड लागलंय ही बातमी आता गावभर पसरली होती. कोणी म्हणे बकुळाच्या आत्म्याने त्यांना पछाडलं आहे तर कोणी म्हणे वेड्या बाळूसोबत इतकी वर्षे राहिल्यामुळे रावसाहेब वेडे झाले आहेत. इतकी वर्षे लोक ज्या वाड्याला रावसाहेबांचा वाडा म्हणून ओळखायचे त्या वाड्याला ‘वेड्यांचा वाडा’ हे नवं नाव मिळालं.

गावातले लोक आपल्याबद्दल काय काय बोलतात ते रावसाहेबांना कळत होतं पण आता त्यांना कशाचीच फिकिर राहिली नव्हती. त्यांच्या जगात फक्त एकाच व्यक्तीला स्थान होतं, बकुळाला. त्यांना वेडा न समजणारी गावात फक्त एकच व्यक्ती होती,ती म्हणजे वेडा बाळू. कारण तो स्वतःच वेडा होता.

गज्याला रावसाहेबांची फार काळजी वाटत होती. त्याने रावसाहेबांना भेटायचं ठरवलं. तो जेव्हा वाड्यावर पोहोचला तेव्हा समोरचं दृश्य पाहून त्याला धक्काच बसला. समोर रावसाहेब त्यांच्या नेहमीच्या खुर्चीवर बसले होते. ते बाजूच्या खुर्चीकडे पाहून बोलत होते. मध्येच ते मोठमोठ्याने हसत होते.

गज्या तिथून जाणार होता तेवढ्यात त्यांनी गज्याकडे पाहिलं व ते गज्याला म्हणाले, “अरे गजा ये ना. अरे बकुळा परत आलीय थांब तुला तिला भेटवतो.” असे म्हणून ते खुर्चीवरून उठले.

गज्या नाईलाजाने आत आला. रावसाहेब समोरच्या रिकाम्या खुर्चीकडे बोट दाखवत म्हणाले, “ओळखलस ना हिला. ही बकुळा.” गज्या काहीच बोलला नाही ते पाहून रावसाहेब म्हणाले, “अरे लाजतोस काय असा बोल की तिच्याशी.” अजूनही गज्या काहिच बोलत नाही हे पाहून त्या रिकाम्या खुर्चीकडे पाहात ते म्हणाले, “जरा लाजतोय तो.”

“रावसाहेब मला तुझ्याशी जरा महत्वाचं बोलायचं आहे. जरा आतल्या खोलीत चल.” असे म्हणून गज्याने रावसाहेबांना ढकलतच आत नेले. आत येताच तो रावसाहेबांना म्हणाला, “हे बघ रावसाहेब आता मी काय सांगतोय ते अगदी शांतपणे ऐकून घ्यायचं.” रावसाहेबांनी नुसती मान हलवली.

गज्या पुढे बोलू लागला – “बकुळा परत आलेली नाही. हे सगळे तुझ्या मनाचे खेळ आहेत. ती फक्त...”

“अरे पण ती रोज इथे येते. माझ्याशी गप्पा मारते. ती खरंच परत आली आहे.” गज्याला मध्येच अडवत रावसाहेब म्हणाले.

“आधी माझं पूर्ण ऐकून घे मग तुला काय सांगायचंय ते सांग.” एवढे बोलून गज्या पुढे बोलू लागला, “रावसाहेब, जसं आपलं शरीर आजारी पडतं तसं आपलं मनही आजारी पडु शकतं. यात चुकीचं कींवा लाज वाटण्यासारखं काहीच नाही. तू तुझं बहुतांश आयुष्य एकट्याने जगला आहेस. आता उतारवयात माणसाच्या शारीरिक गरजा जरी कमी झाल्या तरी भावनिक गरजा तितक्याच वाढतात. तुझं बकुळावर किती प्रेम आहे हे साऱ्या गावाला माहित आहे आणि या प्रेमामुळेच तुला तिचे भास होतायत. जर बकुळा खरंच परत आली असती तर ती मला, गावातल्या इतर लोकांनाही दिसली नसती का?”

“मला वेड लागलं आहे असंच तुला म्हणायचं आहे ना?” रावसाहेब उदासपणे म्हणाले. त्यांच्या चेहऱ्यावरचं हास्य जाऊन चेहेरा जास्तच उदास दिसत होता.

“तसं मला म्हणायचं नाही पण तुला मानसोपचाराची गरज आहे हे मात्र खरं.” गज्या समजावणीच्या सुरात म्हणाला.

आता रावसाहेब चांगलेच संतापले व म्हणाले, “असं बायकांसारखं अडून काय बोलतोस सरळ सांग ना की मला वेड लागलंय !”

आता गज्याचाही संयम सुटला व तो बोलून गेला, “होय तुला वेड लागलंय, बकुळापायी ठार वेडा झालायस तू.” असे म्हणून गज्या पाय आपटत तिथून निघून गेला. रावसाहेबांचा संताप अनावर झाला होता. बराच वेळ त्यांचं अंग थरथरत होतं. नेमका तेव्हाच बाळू हातात जेवणाचं ताट घेऊन रावसाहेबांसमोर आला. त्याच्या चेहेऱ्यावरच ते वेडगळ हसू पाहून तर रावसाहेबांना अजूनच राग आला. “मला हसतोस!” असे म्हणून त्यांनी थरथरत्या हाताने बाळूच्या कानाखाली लगावली. त्या धक्क्याने बाळूच्या हातातलं ताट खाली पडलं व ताटातले सर्व पदार्थ जमिनीवर पसरले.

रावसाहेबांचं वेड हे गावातल्या उनाड मुलांसाठी एक करमणूकीचं साधन झालं होतं. ते रोज वाड्यासमोरच्या झाडामागे लपून रावसाहेबांचे वेडे चाळे पाहत चेष्टा मस्करी करत बसायचे. रावसाहेबांची त्यांच्याकडे नजर जाताच तिथून पळ काढायचे. या मुलांनी रावसाहेबांना चांगलंच भंडावून सोडलं होतं. एक दिवस ते बकुळाला म्हणाले, “आपण इथे नको भेटायला. आपल्याकडे सारखं कोणतरी पाहतंय असं मला वाटतं. इथून पुढे आपण नदीकाठी भेटुयात. उद्या पहाटे सूर्योदयापूर्वी नदी काठावर ये.” बकुळाही तिथे भेटायला तयार झाली.

दुसऱ्या दिवशी पहाटे ठरल्याप्रमाणे रावसाहेब नदीकाठावर पोहोचले. थोड्याच वेळात बकुळाही तिथे पोहोचली. इथे त्यांना कोणाचाच त्रास नव्हता. अजून उजाडायचं होतं. रावसाहेब बकुळाला म्हणाले, “तुला आठवतय का या इथेच मी पहिल्यांदा तुझ्या ओठांचं चुंबन घेतलं होतं.” हे ऐकून बकुळा लाजली आणि तिने दोन्ही हातांनी स्वतःचा चेहेरा झाकून घेतला.

“एवढी काय लाजतेयस!” रावसाहेब म्हणाले आणि त्यांनी हळूच बकुळाचे हात अलगदपणे तिच्या चेहेऱ्यावरून हटवले. बकुळाचा चेहेरा लाजून लाल झाला होता. रावसाहेबांनी तिचा नाजूक चेहेरा आपल्या हातांच्या ओंजळीत धरला व ते तिच्या ओठांचं चुंबन घेण्यासाठी थोडं पुढे झुकले, इतक्यात “ए वेड्या” हे शब्द त्यांच्या कानांवर आले आणि त्यांचा रसभंग झाला. काही अंतरावर गावातली टारगट मुलं उभी होती व ती रावसाहेबांकडे पाहून एकमेकांशी काहीतरी बोलत होती व फिदीफिदी हसत होती. हे पाहून रावसाहेब चांगलेच संतापले आणि त्या मुलांच्या दिशेने पळत सुटले. पण थोडं पुढे गेल्यावर रावसाहेबांना धाप लागली आणि ते तिथेच खाली बसले. उनाड मुलं आता पळाली होती. थोडा दम खाल्यावर रावसाहेबांनी मागे वळून पाहिले पण बकुळा कुठेच दिसत नव्हती. निराश मनाने रावसाहेब परत वाड्यावर आले.

दुसऱ्या दिवशी देखील ते नदीकाठावर गेले. त्या टारगट मुलांकडे लक्ष द्यायचं नाही असं त्यांनी ठरवलं होतं. काहीही झालं तरी संतापायचं नाही असं त्यांनी ठरवलं होतं. काहीवेळातच बकुळा तिथे आली. “तुमास्नी येक सांगायचं हुतं.” आल्याआल्या ती रावसाहेबांना म्हणाली. आज ती फारच गंभीर दिसत होती.

“मग बोल की! वाट कसली बघतेस!” रावसाहेब म्हणाले.

“बाळू आपला पोरगा हाय.”

“काऽऽऽऽय?” रावसाहेब जवळजवळ किंचाळले. स्वतःला सावरत ते पुढे म्हणाले, “काय बोलतीयेस तू? तुझं तुला तरी कळतंय का?”

“व्हय, मला चांगलं कळतंय, बाळू तुमचा नी माजा पोरगा हाय?” बकुळा अतिशय शांतपणे म्हणाली.

“अगं पण कसं शक्य आहे. तो वेडा बाळू माझा मुलगा कसा असेल?” रावसाहेब वैतागून म्हणाले.

“ठिकाय तुमचा माज्यावर इश्वास नसल तर म्या इथून जाते.” असे म्हणून बकुळा जाऊ लागली.

“थांब.” रावसाहेबांचे शब्द ऐकताच ती थांबली. “तू जाऊ नकोस. माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे.” एवढे बोलून रावसाहेबांनी बकुळाच्या कंबरेला विळखा घातला व तिला मिठीत घेऊन ते हुंदके देउ लागले.

xxxxxxxxxxxxxxxxx

रावसाहेब वाड्यावर पोहोचले तेव्हा त्यांचं मन पश्चातापाने व्यापलं होतं. बाळूवर आपल्या मुलावर आपण किती अन्याय केले हा एकच विचार त्यांच्या मनात घोळत होता. वाड्यात येताच बाळूला शोधत पूर्ण वाडा त्यांनी पालथा घातला. शेवटी ते गोठ्यात गेले. तिथे बाळू गाईंना चारा देण्यात मग्न होता. बाळूला पाहताच रावसाहेबांनी त्याला आलिंगन दिले आणि ते लहान मुलासारखे रडू लागले. रडक्या घोगऱ्या आवाजात ते बोलत होते, “मला माफ कर बाळा, माफ कर! तुला गुरासारखा वागवला, वाटेल ते बोललो, पाठीत लाथा हाणल्या, तुझा गाल सुजवला, मी चुकलो बाळा मी खूप मोठी चूक केली, माफ कर, मला माफ कर!” रावसाहेबांच्या अश्रूंमुळे बाळूचा मळका शर्ट खांद्यापाशी भिजला होता. बाळूच्या चेहेऱ्यावर मात्र काहीच बदल नव्हता. त्याचं ते नेहमीचं वेडगळ हसू जणू त्याच्या चेहेऱ्याला कायमचंच चिकटलं होतं. रावसाहेब रडतायत हे त्याला कळत होतं. पण ते आश्रू आनंदाचे, दुःखाचे की पश्चातापाचे आहेत याची त्याला तिळमात्र कल्पना नव्हती.

रावसाहेबांचं बाळूप्रति वागणं आता पूर्णपणे बदललं होतं. त्यांच्या वागण्यात पुत्राबद्दलचं प्रेम तर होतंच पण अपराधीपणाची भावना देखील होती. आता ते त्याला सकाळी हवा तेवढा वेळ झोपू देत होते. एवढंच नाही तर तो झोपेतून उठताच रावसाहेब स्वतः चहा बनवून बाळूला देत होते. मधूनच केव्हातरी त्यांची पश्चाताप बुद्धी जागी व्हायची. 'आपण बाळूसोबत इतके कसे क्रूरपणे वागलो' या विचाराने त्यांना गहिवरून यायचं.

एक दिवस रावसाहेब तालुक्याला जाऊन बाळूसाठी नवीन कपडे घेऊन आले. वाड्यात येताच त्यांनी बाळूला बोलावले व कपड्यांचा ढीग त्याच्यासमोर टाकून ते म्हणाले, "हे बघ बाळू, आता असले मळके, फाटके कपडे वापरायचे नाही." एवढं बोलून ते म्हणाले, "सांग बरं मी काय म्हणालो ते."

"ववववववापरायचे नननननाही" बाळू म्हणाला.

"काय वापरायचे नाही?" एखाद्या लहान मुलाशी जसं मोठी माणसं बोलतात तसे रावसाहेब म्हणाले.

"फफफफाटके कककककपडे!"

हे ऐकून रावसाहेब म्हणाले "बरोबर!" आणि त्यांनी टाळी वाजवली. पुढे रावसाहेब म्हणाले, "आता हे छान छान नवीन कपडे वापरायचे!" "सांग काय वापरायचं?" ते पुन्हा म्हणाले.

"नननननवीन कककककपडे." बाळूने उत्तर दिले.

"शाब्बास" रावसाहेब खुश होऊन म्हणाले.

एक दिवस रावसाहेब न्हाव्याकडे गेले. रावसाहेबांना पाहून तो एकदम दचकला. रावसाहेब न्हाव्याला म्हणाले, "बबन, उद्या वाड्यावर चक्कर टाक. आमच्या बाळुचे केस कापायचे आहेत." हे ऐकून न्हावी उडालाच. त्याला काय बोलावं तेच कळेना. रावसाहेबांना

वेड लागलय हे त्याने ऐकलं होतं. पण हे त्याच्या कल्पनेच्या पलीकडचं होतं. रावसाहेबांना तिथून घालवण्यासाठी तो कसाबसा “हो” म्हणाला. रावसाहेबांनी दिवसभर न्हाव्याची वाट पाहिली पण न्हाव्याने काही दर्शन दिलं नाही. शेवटी न्हाव्याला शिव्यांची लाखोली वाहून रावसाहेबांनी हातात कात्री घेतली, बाळूला पाटावर बसवला व ते बाळुचे केस कापू लागले. बाळूची वेडीवाकडी वाढलेली दाढीही रावसाहेबांनी कात्रीने कापली आणि ते बाळूच्या बदललेल्या रुपाकडे कौतुकाने पाहू लागले.

वेड्या बाळुचे केस कापायला रावसाहेबांनी न्हाव्याला वाड्यावर बोलावलं ही बातमी आता घरोघरी पोहोचली आणि गावात चर्चांना उधाण आलं. रावसाहेबांच्या वेडाने आता परिसीमा गाठली आहे अशी खात्री संपूर्ण गावाला झाली होती. गावात सर्वात जास्त शिकलेला माणूस, ज्याने एकेकाळी आर्मीत ब्रिगेडियर पदापर्यँत झेप घेऊन गावाचं नाव आख्या जिल्ह्यात गाजवलं होतं अशा माणसाची ही आवस्था पाहून गावातील जुनी जाणती माणसं दुखावली होती. सर्वात जास्त वाईट गज्याला वाटत होतं. आपल्या मित्राला काहीही करून यातून बाहेर काढायला हवं असं त्याला फार वाटायचं. पण खूप विचार करुन देखील काहीच मार्ग सापडत नाही हे पाहून तो हतबल झाला होता. त्याने काहीच प्रयत्न केले नाहीत असंही नव्हतं. एकदा त्याने त्याच्या ओळखीतल्या एका मानसोपचार तज्ञाला फोन लावला. फोनवरून त्याने रावसाहेबांबद्दल थोडक्यात माहिती डॉक्टरना सांगितली. पण खूप आग्रह करून देखील डॉक्टर गावात यायला तयार नव्हते. मी तिथे येऊन काहीही उपयोग होणार नाही. तुम्हालाच त्यांना घेऊन माझ्या हॉस्पिटलमध्ये यावं लागेल. असं डॉक्टरांनी गज्याला सांगितलं. पण हे शक्य नव्हतं.

नदीकाठी रावसाहेब आणि बकुळाच्या गाठीभेटी अजूनही सुरू होत्या. असंच एकदा बोलता बोलता ते बकुळाला म्हणाले, “इतके दिवस मी आपल्या बाळूबरोबर फार वाईट वागत आलो. त्याला वाटेल तसं बोललो. अजूनही हे सगळं आठवलं की स्वतः चाच राग येतो.”

हे ऐकून बकुळा डोळ्यात पाणी आणून म्हणाली, "लै तरास झेललाय हो माज्या पोरानं. फकस्त तुमीच नाय तर समद्या गावानेच त्येला लै तरास दिलाय. आता तरी त्येला सांभाळा."

"आता मी आपल्या बाळूला हातावरच्या फोडसारखा जपेन. मी त्याच्यासाठी नवीन कपडे देखील आणलेत. मी स्वतःच्या हाताने त्याचे केस कापलेत. तू वाड्यावर एकदा येऊन पहाच कसा राजबिंडा दिसतो आपला बाळू." हे बोलताना रावसाहेबांचा कंठ दाटून आला होता.

दुसऱ्या दिवशी रावसाहेब नेहमीप्रमाणे पहाटे उठून नदीकाठावर गेले. बराच वेळ झाला तरी अजून बकुळा तिथे आली नव्हती. रावसाहेब अस्वस्थ झाले होते. इतक्या दिवसात बकुळाने कधी वेळ चुकवली नव्हती. आता क्षितिजावर केशरी रंगाची उधळण करत सूर्याने दर्शन दिलं. बकुळाने मात्र अजूनही रावसाहेबांना दर्शन दिलं नव्हतं. आता मात्र ते चांगलेच वैतागले व तिथून निघाले. वाड्यात पोहोचताच ते झोपायच्या खोलीत गेले व त्यांनी खोलीचं दार आतून लावून घेतलं. पूर्ण दिवसभर ते खोलीबाहेर आले नाहीत. दुपारचं जेवणही ते जेवले नाहीत.

दुसऱ्या दिवशी पहाटे ते नदीवर पोहोचले. आजही बकुळा येईल की नाही अशी शंका त्यांच्या मनात होती आणि त्यांची शंका खरी ठरली. बकुळा आली नाही. बराच वेळ वाट पाहून ते वाड्यावर परतले. सलग चार दिवस हेच झालं. बकुळा असं का वागतीये तेच रावसाहेबांना समजत नव्हतं. 'आपलं काही चुकलं तर नाही ना?' हा विचार त्यांच्या मनात येऊन गेला. पण खूप विचार करून देखील या प्रश्नाचं योग्य असं उत्तर त्याना मिळत नव्हतं.

आतातर रावसाहेबांना जेवणही जाईना. जेवणाचं ताट समोर येताच ते दोन चार घास कसे बसे खायचे व उरलेलं ताट बाजूला सारायचे. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खंगत चालली होती. रात्री झोपही लागत नव्हती. ते रात्रभर अंथरुणावर लोळत पडायचे. पहाटे केव्हातरी त्यांना झोप लागायची. असंच एकदिवस पहाटे त्यांना झोप लागली असताना एक स्वप्न पडलं.

त्या स्वप्नात बकुळा आली. स्वप्नातच तिला त्यांनी खूप प्रश्न विचारले तेव्हा तिने सांगितलं, “आता तुमास्नी भेटायला मला जमनार न्हाय.” हे ऐकून काकुळतीला येऊन रावसाहेब म्हणाले,

“असं करू नकोस ग बकुळा. का मला असा त्रास देतेयस. मी नाही जगू शकणार तुझ्याशिवाय.”

“म्या तरी काय करू. माजा बी नाविलाज हाय. माजं जगच आता येगळ हाय. तुमच्या जगात आता मला येता येनार न्हाई.” ती जेकाही बोलली त्यातलं राव साहेबांना काहीच कळत नव्हतं.

ते म्हणाले, “मग तुझं जग कुठे आहे सांग मीच तिथे येतो.”

हे ऐकून बकुळा म्हणाली, “माज्या जगात यायला पैलं तुमाला मराया लागल.” बकुळा काय बोलली हे रावसाहेबांना समजायला थोडा वेळ जावा लागला.

आता रावसाहेबांचा निर्णय झाला होता. हा निर्णय त्यांच्यासाठी नक्कीच सोपा नव्हता. पण बकुळासाठी मरायलाही ते तयार होते. ते खंबीरपणे म्हणाले, “ठीक आहे, मी मरायला तयार आहे.” हे ऐकताच बकुळा गायब झाली आणि रावसाहेब स्वप्नातून जागे झाले.

थोड्या वेळाने आपण काय करून बसलो याची त्यांना जाणीव झाली. पण आता माघार घेणं शक्य नव्हतं. आता त्यांना बाळूची काळजी वाटत होती. आपण मेल्यावर बाळूचं कसं होणार या काळजीने त्यांचं मन त्रस्त झालं होतं. त्यांनी वकिलाला फोन लावला व तातडीने वाड्यावर यायला सांगितलं. कुलकर्णी वकील रावसाहेबांचे मित्रच होते. त्यांनाही रावसाहेबांच्या वेडाबद्दल समजलं होतं. पण रावसाहेबांनी आपल्याला एवढ्या तातडीने का बरं बोलावलं असेल या प्रश्नाचं उत्तर मात्र त्यांना सापडत नव्हतं. थोड्याच वेळात ते वाड्यावर पोहोचले. अंगणात बाळू झाडांना पाणी घालत होता. रावसाहेब व्हरांड्यात बसले होते. ते फारच थकल्यासारखे दिसत होते. चेहेऱ्यावर मात्र एक प्रकारचं समाधान दिसत होतं. कुलकर्णी

वकिलांना पाहताच रावसाहेब खुर्चीवरून उठले. त्यांनी हातानेच आत येण्याची खूण केली व वकिलांना खुर्चीवर बसण्यास सांगितलं. इकडचं तिकडचं काहीच न बोलता रावसाहेबांनी थेट विषयालाच हात घातला. ते म्हणाले, “माधव, आज मी माझं मृत्यपत्र लिहिणार आहे आणि त्यासाठीच मी तुला बोलावलंय.” हे वकिलसाहेबांना बिलकुल अपेक्षित नव्हतं. ते म्हणाले, “अरे पण तू मृत्यपत्र....” “का लिहितोयस असंच तुला म्हणायचं आहे ना? तू फक्त मी सांगतो ते कर बाकी प्रश्न विचारू नकोस.” वकिलसाहेबांना मध्येच तोडून रावसाहेब म्हणाले. आता बोलण्यात काही अर्थ नाही हे वकिलसाहेबांनी ओळखलं व बॅगेतून एक कागद काढला. “सांग काय लिहायचं.” वकिलसाहेब म्हणाले. “माझी सगळी प्रॉपर्टी या वाड्यासकट माझ्या मृत्यनंतर बाळूच्या नावावर करावी.” हे ऐकून वकीलसाहेबांना धक्काच बसला. पण बोलायची सोय नव्हती. त्यांनी मुकाट्याने रावसाहेबांचे शब्द कागदावर उतरवले. “माझा अंत्यविधी बाळूच्या हातून करावा.” रावसाहेबांनी दुसरा मुद्दा सांगितला. हे ऐकून तर वकिलसाहेब उडालेच. त्यांनी तोही मुद्दा लिहिला व कागद रावसाहेबांकडे देऊन त्यांना सही करायला सांगितली. सही करून झाल्यावर वकिलसाहेबांना आपल्याकडून एक चूक झाली आहे हे लक्षात आलं. मृत्युपत्रासाठी दोन विटनेसची सही लागणार होती. एक सही ते स्वतः करू शकत होते. अजून एक सही लागणार होती. त्यांनी हे रावसाहेबांना सांगायचा प्रयत्न केला पण “तूच काय ते पाहून घे.” असं ते तिरसटपणे म्हणाले. रावसाहेबांचा निरोप घेऊन वकिलसाहेब तिथून निघाले.

रावसाहेब स्वतःचं काहितरी बरवाईट तर करणार नाहीत ना? अशी शंका वकिलसाहेबांच्या मनात आली. वाडयातून निघताच त्यांनी थेट गज्याचं घर गाठलं. गज्या नेमका काही कामानिमित्त तालुक्याला गेला होता. त्याचा फोनही लागत नव्हता. शेवटी बऱ्याचवेळाने गज्याचा फोन लागला. वकिलसाहेबांनी रावसाहेबांच्या वाड्यावर घडलेलं सर्व काही गज्याला सांगितलं. मी लगेच इथून निघतो असे सांगून गज्याने फोन ठेवला.

वकिलसाहेब जाताच रावसाहेब पुन्हा त्यांच्या झोपायच्या खोलीत आले. कपाटातून त्यांनी एक डायरी बाहेर काढली. डायरीच्या शेवटच्या पानावर त्यांनी काहीतरी लिहिलं. लिहिताना त्यांचे हात थरथरत होते. लिहून झाल्यावर त्यांनी डायरी बाजूला ठेवली व टेबलवरची झोपेच्या गोळ्यांची डबी उचलली व बूच उघडलं. डबीत फक्त दोनच गोळ्या शिल्लक पाहून रावसाहेब निराश झाले. आता त्यांना मरणासाठी दुसरा मार्ग शोधणं भाग होतं. बराच वेळ विचार केल्यावर त्यांना मार्ग सापडला. रावसाहेबांनी पुन्हा कपाटाचं दार उघडलं व आतून एक डबी बाहेर काढली. काही वर्षांपूर्वी रावसाहेबांनी उंदीर मारण्यासाठी ही विषाची डबी आणली होती. त्यांनी डबीचं झाकण उघडलं. रावसाहेबांचा हात आता थरथरत नव्हता. चेहेऱ्यावर वेगळंच समाधान होतं. कारण आता लवकरच ते बकुळाच्या जगात जाणार होते. रावसाहेबांनी विष घशात ओतून डबी रिकामी केली आणि दोन्ही हातांनी तोंड दाबून धरलं. काही क्षणातच मासा पाण्याबाहेर येताच जसा तडफडतो तसं रावसाहेबांचं पूर्ण शरीरच तडफडू लागलं. तोंडातून फेस आला. थोड्यावेळाने ही तडफड थांबली.

तालुक्यातून येताच गज्या थेट वकिलांकडे गेला. दोघेही तात्काळ वाड्याकडे निघाले. वाड्यावर पोहोचताच दारातच बाळू बसलेला त्यांना दिसला. तो शेरुकडे पाहत काहीतरी पुटपुटत होता. दोघेही थेट रावसाहेबांच्या खोलीत गेले आणि समोरचं दृश्य पाहून आपण पोहोचायला उशीर केला याची त्यांना जाणीव झाली. समोर बेडवर रावसाहेब निःचेष्ट पहुडले होते. त्यांच्या तोंडून फेस आला होता. त्यांच्या बाजूलाच बेडवर एक छोटी डबी होती. गज्याने पुढे जाऊन टेबलवरची डायरी उचलली. तिच्या प्रत्येक पानावर रावसाहेबांनी बकुळासोबत झालेला संवाद लिहिला होता. गज्याने डायरीचं शेवटचं पान उघडलं. त्यावरचा मजकूर वाचून त्याला धक्काच बसला. त्यावर लिहिलं होतं-

प्रिय गज्यास,

तुला मी फार त्रास दिला ना रे? मी तुझ्या अंगावर ओरडलो. पण तू मला माफ करशीलच याची मला खात्री आहे. मी तरी काय करू रे! तुला तर माहीतच आहे माझं बकुळावर किती प्रेम आहे! आता मी हे जग सोडून चाललोय. कायमचा. आता मी बकुळाच्या जगात जाणार आहे. तसही तुम्ही सगळ्यांनी मला वेडा ठरवलच आहे. पण माझी काळजी करू नकोस. जाता जाता तुझ्यावर एक मोठी जबाबदारी टाकून जात आहे. माझ्या पश्चात माझ्या लाडक्या बाळूला सांभाळ. असंही मी माझी सर्व प्रॉपर्टी त्याच्या नावावर केली आहे, पण कोणीही त्याला फसवू शकतो. फार भोळा आहे रे तो. पुन्हा भेटू असं लिहायची फार इच्छा आहे पण ते आता शक्य नाही.

तुझाच लाडका रावसाहेब

गज्याच्या डोळ्यातले आश्रू थांबत नव्हते. तो गहिवरल्या आवाजात वकीलसाहेबांना म्हणाला, "अंत्यविधीची तयारी करा." रावसाहेबांच्या अंत्यविधीला पूर्ण गाव हजर होतं. रावसाहेबांचा मृतदेह तिरडीवर ठेवला होता. गुरुजींनी सांगितल्याप्रमाणे सर्व तयारी झाली होती. चार जणांनी मृतदेह उचलून सरणावर ठेवला. गज्याने बाळूच्या हातात मृतदेह जाळायसाठीची काठी दिली. गज्याने सांगताच बाळूने त्या काठीने सरण पेटवलं. बाळूला अग्निदेताना पाहून लोकांची कुजबुज वाढली. नेहमीप्रमाणे वेडगळ हसत रावसाहेबांच्या मृतदेहाला अग्नी देणाऱ्या बाळूकडे पाहताना कोणाचाच स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता.

गज्याचं लक्ष बाजूलाच उभ्या असलेल्या एका स्त्रीकडे वेधलं होतं. त्या स्त्रीच्या डोळ्यातून पाणी वाहत होतं. त्याला तिचा चेहेरा ओळखीचा वाटत होता. चेहेऱ्यावरील सुरकुत्यांमुळे वय जाणवत होतं. तरीपण ती तरुणपणी फारच सुंदर असणार हे तिच्याकडे पाहून कोणीही

सांगितलं असतं. आता गज्याने त्या स्त्रीला ओळखलं होतं. अंत्यविधी उरकताच तिच्याशी बोलायचं गज्याने मनोमन ठरवलं. लोकांची कुजबुज अजूनही सुरूच होती. एकदाचा अंत्यविधी संपला व हळूहळू गर्दी पांगली. गज्याचं लक्ष मात्र त्या स्त्रीकडेच होतं. तिने जळणाऱ्या चितेकडे पाहून दोन्ही हात जोडून नमस्कार केला व ती मागे वळून रस्त्याला लागली. गज्यापण तिच्यामागे जाऊ लागला पण काही क्षणातच तो थांबला. आता बोलून काहीच फायदा नाही याची जाणीव त्याला झाली होती. 'आधीच आली असतीस तर हा दिवस पाहावा लागला नसता' तो मनातच त्या स्त्रीला उद्देशून म्हणाला व तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत राहिला.

अंत्यविधी संपताच गज्याने गुरुजींचा निरोप घेतला व तो बाळूसोबत वाड्यावर आला. आजची रात्र तो वाड्यावरच थांबणार होता. आता रात्र झाली होती. शेजारच्या घरातल्या काकूंनी पिठलंभात दिला होता. तो खाऊन दोघेही झोपले. बाळूला लगेच झोप लागली. गज्याला मात्र काहिकेल्या झोप लागत नव्हती. लागेल तरी कशी?

पहाट होताच कोंबडा अरवला तसा बाळू जागा झाला. त्याने बाजूलाच झोपलेल्या गज्याकडे पाहिले व चहा करण्यासाठी तो स्वयंपाकघरात गेला. चहा तयार झाल्यावर त्याने कपात ओतला. कप हातात घेऊन तो व्हरांड्यात गेला. मात्र त्याला तिथे रावसाहेब दिसले नाहीत. आता बाळू रावसाहेबांच्या खोलीकडे गेला. त्याने दरवाजा हाताने ढकलला व आत डोकावून पाहिलं. तिथेही रावसाहेब दिसेनात हे पाहून तो तिथेच दारापाशी खाली बसला. त्याने एकदा समोरच्या चित्राकडे पाहिले व चहाचा कप ओठांना लावला.

x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x

x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x

# कर्मबंध

पावसाळ्याचे दिवस होते. समुद्र शांत होता. आकाशात काळे ढग साचले होते व एरवी डोळ्यांना सुखावणारा, आकाशी रंगाने नटलेला समुद्र गडद राखाडी रंगाच्या उग्र ढगांचे प्रतिबिंब पाण्यात उमटल्यामुळे भेसूर वाटत होता. तुरळक पर्यटकांच्या हालचालीमुळे व पक्ष्यांच्या किलबिलाटामुळे समुद्र थोडाफार जिवंत भासत होता. एरवी पर्यटकांनी गजबजलेला किनारा पावसाळ्यामुळे अगदीच रिकामा पडला होता. हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढेच पर्यटक जणू टक्कल पडलेल्या डोक्यावरील तुरळक केसांप्रमाणे भासत होते. तिथे झोपळ्यावर अंग सैल सोडून विश्रांती घेणारी जोडपी होती. वाळूत बीळ करून त्यात लपलेल्या खेकड्यांना पकडण्यासाठी खेकडे बिळातून बाहेर यायची वाट पाहणारी खोडसर मुलं होती. तसेच निसर्गाचा आस्वाद घ्यायचा सोडून मोबाईलमध्ये डोकी खुपसून बसलेली तरुण मुलं देखील होती.

या सगळ्यांपासून सूर, खडकावर एक वृद्ध मनुष्य बसला होता. त्याचा देह चांगलाच उंचापुरा होता. पाठ मात्र वृद्धापकाळामुळे थोडी झुकली होती. डोक्यावरचे पांढरे लांब केस वाऱ्यामुले हलत होते. त्याचा चेहेरा रुंद होता व कपाळ भव्य होते. चेहेऱ्यावर सुरकुत्या उमटल्या होत्या. पांढरीशुभ्र झुपकेदार मिशी चेहेऱ्याला शोभत होती. त्याचा चेहेरा गंभीर दिसत होता व नजर समुद्राच्या पाण्यावर स्थिरावली होती. त्याचे डोळे..........त्याचे डोळे मात्र भयंकर दुःखी दिसत होते. जणू काही या जगातलं सारं दुःख त्याच्या डोळ्यात एकवटलं होतं.

पाहता पाहता दुपार झाली. इतका वेळ न हलणारे चिवट ढग हळू हळू दूर जाऊ लागले व थोड्याच वेळात नाहीशे झाले. ढगांच्या आड लपलेल्या सूर्याने दिवसभरात पहिल्यांदाच दर्शन दिलं. तो वृद्ध मनुष्य मात्र अजूनही खडकावरच बसला होता. जणूकाही तो त्या खडकाचाच एक भाग झाला होता. त्याच्या नजरेतील दुःख तसूभरही कमी झालं नव्हतं.

सूर्य समुद्राला स्पर्श करण्यास आतुर झाल्याप्रमाणे खाली येत होता. इतक्या वेळात पहिल्यांदाच खडकावर हालचाल दिसली. तो वृद्ध मनुष्य खडकावरून उठला व समुद्राच्या दिशेने चालू लागला. तो चालत पाण्याजवळ गेला. एक मंद लाट आली व त्याचे पाय भिजवून गेली. तो चालत पुढे गेला. अजूनही तो न थांबता चालत होता. आता त्याचे कपडे भिजले होते व पाणी छातीपर्यंत आलं होतं. पण भान हरपल्यागत तो चालतच होता. मध्येच एखादी लाट येत होती व त्याला भिजवत होती. त्याच्या नाकातोंडात पाणी जाउ लागलं तरीदेखील तो पुढे जात होता. अचानक कोणीतरी त्याचा हात पकडला व त्याला मागे ओढलं. आता तो वृद्ध मनुष्य भानावर आला व त्याने मागे वळून पाहिलं. एका तरुणाने त्याचा हात पकडला होता व तो तरुण त्याला किनाऱ्याच्या दिशेने ओढत होता. त्या तरुणाची अंगकाठी तशी साधारणच होती मात्र त्याच्या मनगटात असाधारण ताकद होती. वृद्ध मनुष्याच्या शरीरातील ताकदच जणू नाहीशी झाली होती. तो कोणताही प्रतिकार न करता हतबलपणे ओढला जात होता.

थोड्या वेळात ते किनाऱ्यापाशी पोहोचले. त्या तरुणाने वृद्ध मनुष्याला जवळच्याच एका झाडाखाली बसवलं व अंग पुसण्यासाठी खांद्याला अडकवलेल्या पिशवीतून एक कापड काढून दिलं. वृद्ध मनुष्य अंग पुसत पुसत त्या तरुणाला न्याहाळत होता. सावळ्या रंगाचा, मध्यम उंचीचा तो तरुण वृद्ध मनुष्याकडे कुतूहलाने पाहत होता. सावळा असला तरी त्या तरुणाच्या चेहेऱ्यावर एक प्रकारचं तेज होतं. तसेच त्या तरुणाच्या चेहेऱ्यावरील हास्यदेखील वृद्ध मनुष्याचं लक्ष वेधून घेत होतं. कित्येक वर्षात त्याने असं हास्य पाहिलं नव्हतं. त्या तरुणाने नाविकाचे कपडे घातले होते.

बराच वेळ कोणीच काही बोललं नाही. शेवटी त्या तरुणाने विचारलं, “काय रे म्हाताऱ्या, एवढ्या खोल पाण्यात कशाला चालला होतास? जीवनाला कंटाळलास काय?” “होय, कंटाळलोय मी जीवनाला. म्हणूनच जीव द्यायला निघालो होतो.” वृद्ध मनुष्य उदासपणे म्हणाला. “मुलाने हाकलले की काय घरातून? शरीराने चांगला धडधाकटा दिसतोयस.”

तरुणाने विचारलं. वृद्ध मनुष्याने इकडे तिकडे पाहिलं, जवळपास कोणी नाही याची खात्री होताच तो तरुणाला म्हणाला, “मी यम आहे.” हे ऐकून तो तरुण मोठमोठ्याने हसायला लागला. हसतहसतच तो वृद्ध मनुष्याला म्हणाला, “म्हाताऱ्या कालची उतरली नाही वाटतं अजून का दिवसाढवळ्याच घेतली आहेस?” तो पुढे म्हणाला, “तु यम आहेस ना, ठीक आहे. मग मी पण कृष्ण आहे.” एवढे बोलून स्वतःच्याच विनोदावर तो पुन्हा हसू लागला. “ठीक आहे. मला माहित आहे इतक्या सहजासहजी तुझा माझ्यावर विश्वास बसणार नाही. तो पहा माझा रेडा तिथे उभा आहे.” असे बोलून त्या वृद्ध मनुष्याने जवळच उभ्या असलेल्या एका दांडग्या, चकचकीत रेड्याकडे बोट दाखवलं. तरुण हसायचा थांबला व त्याने गंभीर आवाजात विचारलं, “बर, थोड्या वेळासाठी तू यम आहेस असं मी मानतो. पण इतरांचे जीव घेणारा तू यमदेव असून तूला स्वतःला जीव द्यावासा का वाटतोय? आणि जीव देण्यासाठी तू इथे का आला आहेस?”

यम बोलू लागला, “मी जे काही सांगणार आहे ते कदाचित तुला खरं वाटणार नाही. तरीसुद्धा ऐक. गेली शेकडो वर्षे मी एकच काम करत आलोय. जेव्हा माणूस किंवा कोणताही जीव मरण पावतो तेव्हा त्याचा आत्मा शरीराचा त्याग करतो. आत्म्याला अंत नाही. तो सतत शरीर बदलत राहतो. शरीर जरी नष्ट झाले तरी आत्मा नष्ट होत नाही. आत्म्याचं किंबहुना त्याने धारण केलेल्या शरीराचं या जन्मातलं आयुष्य हे त्या आत्म्याने पूर्वजन्मी केलेल्या कर्मावर अवलंबून असतं आणि हा पूर्वजन्म केवळ एकच असेल असं नाही तर अनेक जन्मांच्या कर्मावर त्याचं या जन्मातलं जीवन कसं असेल हे ठरतं. जर त्या आत्म्याने पूर्वीच्या जन्मांमध्ये पुण्यकर्म केलं असेल तर त्याच्या पुढच्या जन्मातील आयुष्यात चांगल्या घटना घडतात किंवा त्याला कमी कष्ट कमी त्रास होतो असेही आपल्याला म्हणता येईल. जर त्या आत्म्याने पूर्वजन्मात दुष्कर्म म्हणजेच वाईट काम केलं असेल तर त्याला पुढच्या जन्मात कष्टाचं यातनामय आयुष्य जगावं लागतं. जेव्हा एखाद्या मनुष्याचा मृत्यू होतो तेव्हा त्याच्या आत्तापर्यंतच्या कर्मानुसार त्याला म्हणजेच त्याच्या आत्म्याला स्वर्गात किंवा नरकात जावं लागतं. त्याचा स्वर्गातील किंवा नरकातील काळ हा त्याने केलेल्या चांगल्या किंवा वाईट

कामांच्या प्रमाण आणि दर्जावरून ठरतो. ठराविक वेळ संपताच त्याला पुन्हा एकदा पृथ्वीवर जन्म घ्यावा लागतो. प्रत्येक आत्म्याला त्याच्या कर्माचा हिशेब करून त्याला स्वर्गात किंवा नरकात पोहोचवण्याचं काम मी करतो." "हे सगळं मला माहित आहे." तरुण म्हणाला. "तू भगवत गीता, उपनिषदे, पुराण वगैरे वाचलयस वाटतं." यम म्हणाला. यावर तरुण काहिच बोलला नाही. तो केवळ हसला. यम पुढे सांगू लागला, "तर मी माझं हे काम युगानुयुगे न चुकता करत आलोय. पण जेव्हा पासून कलियुग सुरू झालंय तेव्हा पासून मी खूपच अस्वस्थ झालोय. स्वर्गात बसून पृथ्वीतलावर घडणाऱ्या सर्व घटना मी पाहत असतो. मी पाहतो, लहान लहान मुलींवर बलात्कार होतात, वाईट गुंड लोक सज्जन असहाय लोकांना त्रास देतात, लुटतात, भ्रष्ट राजकारणी जनतेच्या पैशांची लूट करतात, कित्येक गुन्हेगार गुन्हा करून देखील पैशांच्या सत्तेच्या जोरावर मोकाट सुटतात, धर्माच्या नावाखाली धर्मांध लोक निष्पाप लोकांचा जीव घेतात. या सर्वांचा जीव घेऊन त्यांच्या आत्म्यांना नरकात ढकलून द्यावं असं मला सारखं वाटतं, पण त्यांच्या पूर्वजन्मीच्या सत्कर्मामुळे त्यांनी कमावलेल्या पुण्यामुळे की काहीच करू शकत नाही. मी नुसता असहाय्यपणे समोर जे घडतंय ते पाहत राहतो. आणि याउलट गरिबीमुळे, पोटात अन्न न गेल्यामुळे, थंडीच्या दिवसात अंगात घालायला कपडे नसल्यामुळे तसेच उघड्यावर झोपून लहान लहान मुलांना मरताना पाहीले की; येताना आईस्क्रीम आणतो असे आपल्या पाच वर्षाच्या मुलीला सांगून घराबाहेर पडलेला बाप जेव्हा रात्री घराच्या वाटेवर असताना बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडतो तेव्हा त्याचं छीन्नविछीन्न झालेलं शरीर पाहून त्याच्या बायको-मुलीने केलेला आक्रोश पाहिला की; जेव्हा एखादा नराधम अल्पवयीन मुलीला लग्नाचं आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार करतो आणि तिची हत्या करून तिला कुठेतरी दुर्गम भागात फेकून देतो तेव्हा तिचं रक्ताळलेलं शरीर पाहिलं की; जेव्हा एखादा मुलगा आपल्या वयोवृद्ध आई-बापाला ज्या हातांनी त्याचा हात धरून त्याला चालायला शिकवलं तेच हात धरून घराबाहेर काढतो, त्या आई-बापाच्या डोळ्यातील असहाय्यता पाहिली की, मला प्रचंड वेदना होतात.

हे सर्व मी इतकी वर्ष सहन केलं. पण आता माझी सहनशक्ती संपली. इतकं मोठं ओझं मनावर घेऊन मी नाही जगू शकत. त्यामुळे मी हे जीवन संपवण्याचा निर्णय घेतला. याआधी मी स्वर्गात देखीलं जीव द्यायचा प्रयत्न केला पण मला यश नाही मिळालं. म्हणून मी पृथ्वीवर आलो. पृथ्वीवर आल्यावर इथे येण्याआधी दोन वेळा मी जीव द्यायचा प्रयत्न केला पण दोन्ही वेळा मी वाचलो. एकदा मी एका उंच पर्वतावरून दरीत उडी मारणार होतो पण ऐनवेळी एका साधूने माझा हात धरून मला मागे खेचलं. दुसऱ्यावेळी मी एका रेल्वेस्टेशनवर गेलो ब रेल्वेची वाट पाहत थांबलो. एक रेल्वे येताना दिसली. रेल्वे जवळ येताच रुळावर उडी घेण्यासाठी मी धावलो तर तिथेसुदा एका माणसाने मला मागे खेचले आणि मी वाचलो. मग शेवटचा पर्याय म्हणून मी इथे आलो होतो तर तू मला वाचवलेस. बहुतेक मरण माझ्या नशिबातच नाही." एवढे बोलून यम थांबला. तो खूप निराश दिसत होता. त्या तरुणाने सगळं शांतपणे ऐकून घेतलं होतं. तो यमाला म्हणाला, "आधी तूच मला कर्मयोग सिद्धांताबद्दल सांगितलस आणि तुला सगळं माहिती असून देखील तू असा का वागतोयस?" त्यावर यम म्हणाला, "तुझं अगदी बरोबर आहे. पण तू माझ्या बाजूनं विचार करून बघ. मला किती यातना सोसाव्या लागतात याची तुला कल्पना येईल." "पृथ्वीवरील मनुष्य तुझ्यासारख्या देवांकडे एक आदर्श म्हणून पाहतात. जरा विचार कर. समजा, न्यायालयामध्ये न्यायाधीशाचा मुलगा आरोपी म्हणून उभा आहे आणि आपल्या मुलालाच फाशीची शिक्षा देण्याचं दुर्दैवी काम न्यायाधीशाला करायचं आहे. आपल्या मनाला होणाऱ्या यातना सहन न झाल्यामुळे जर त्या न्यायाधीशाने आत्महत्या केली तर ते योग्य असेल?" यम त्या तरुणाचं बोलणं शांतपणे ऐकत होता. तरुण पुढे बोलू लागला, "आणि जर तुच जीव दिलास तर तुझं काम कोण करेल? या सगळ्याचे काय परिणाम होतील याचा तू विचार केला आहेस का?" यमाने नकारार्थी मान हलवली. ठीक आहे, मी तुला एक उदाहरण देतो. एका गुन्हेगाराला फाशीची शिक्षा झाली आणि त्याच्या आत्म्याने शरीराचा त्याग केला. आता जर तूच नसशील तर त्या आत्म्याला नरकात नेण्याचं काम कोण करेल. हे फक्त एक उदाहरण झालं. पृथ्वीतलावर रोज कित्येक लोक मरण पावतात. त्यातले काहीजण स्वर्गात

जातात तर काही नरकात. पण जर त्यांना स्वर्गात किंवा नरकात पोहोचवण्याचा योग्य तो निर्णय घेऊन त्यांना पोहोचवण्याचं काम करणारा तूच जर मेलास तर किती अराजकता माजेल याचा जरा विचार कर आणि तू घेतलेल्या निर्णयाचा पुनर्विचार कर.” त्या तरुणाने सांगितलेलं सर्व काही यमाला पटलं होतं. तो म्हणाला, "तू जे काही मला सांगितलस ते मला पटतय. या सगळ्या गोष्टींचा मी याआधी विचारच केला नव्हता. भावनेच्या आहारी गेल्यामुळे माझी मती कुंठीत झाली होती. पण तू माझे डोळे उघडलेस. मला माहीत नाही तू नक्की कोण आहेस, पण तू सामान्य माणूस नक्कीच नाहीस." बोलता बोलता यमाचं लक्ष्य तरुणाच्या पायांकडे गेलं. त्याच्या एका पायावार एक काळा डाग होता. तो पाहून यमाने त्या तरुणाला विचारलं, "तुझ्या पायावरचा तो काळा डाग कसला?" "जुन्या जखमेचा डाग आहे. जखम भरली पण डाग तसाच राहिला तरुण म्हणाला. हे ऐकून यम हसला व म्हणाला, "मला आता जायला हवं. इतक्या दिवसांची कामं मला करायची आहेत. अजून वेळ दवडून चालणार नाही. मी निघतो. यम जवळच उभ्या असलेल्या रेड्याच्या पाठीवर बसला व तिथून निघाला. तो तरुण यमाच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत थोडावेळ तिथेच उभा होता. त्याच्या चेहेऱ्यावरचं निर्मळ हास्य अजूनही कायम होतं. यमाची आकृती नाहीशी होताच तो तरुण जवळच्याच एका झाडाच्या बुंध्याला टेकून बसला. सूर्य आता मावळतीला आला होता. गडद भगव्या रंगाचा सूर्याचा गोळा समुद्राच्या निळ्याशार पाण्याला टेकल्यासारखा दिसत होता. हे विलोभनीय दृश्य पाहत तो तरुण झाडाला टेकून निवांत बसला होता. तो जुन्या आठवणीत हरवला होता. सूर्य आता दिसेनासा झाला. त्याच्या गडद भगव्या रंगाने मात्र सारा आसमंत व्यापला होता. तरुणाने त्याच्या जवळच्या पिशवीतन एक बासरी काढली व ती ओठाला लावून वाजवू लागला. बासरीतून निघणारे मधुर स्वर पक्ष्यांच्या किलबिलाटात मिसळत होते. समुद्र अजूनही शांतच होता.

x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x

पिवळा रंग

बॉसला लिव्हसाठी मेल केला आणि घरी गेल्यावर काय काय करायचं याचा विचार करायला लागलो. पण माझ्या बाबतीत नेहमी असंच होतं. घरी गेल्यावर काय करायचं हे मी आधीपासूनच ठरवतो आणि ठरवलेल्यापैकी काहीच न करता अंथरुणावर लोळत वेळ घालवतो आणि जेव्हा निघण्याचा दिवस उजाडतो तेव्हा लक्षात येतं की आपण चार दिवस काहीच केलं नाही. घरातून बाहेर पडायची इच्छा तर नसते, पण करणार काय, ऑफिस मधलं काम तर मलाच करयला लागणार आहे. बॉसला फोन करुन आजारी आहे असं सांगावं आणि अजून एक दिवस घरी लोळत पडावं असा विचारही मनांत येतो, पण मग मी माझ्या मनावर आवर घालतो आणि घरातून बाहेर पडून बसस्टॅण्डवरून परत पुण्याची गाडी पकडतो.

पण आपण कुठे होतो? हा, मी बॉसला लिव्हसाठी मेल केला आणि सोमवार आणि मंगळवार अशी दोन दिवसांची रजा मागितली. शनिवार आणि रविवार सुट्टी असल्यामुळे सलग चार दिवस घरी म्हणजेच कोल्हापूरला घालवण्याचा माझा विचार होता आणि बॉसनेही यावेळी कोणताही प्रश्ण न विचारता माझी रजा मंजूर केली. तसं मी बॉसला आधीच बोललो होतो की हातातलं काम संपवून जाईन आणि बोलल्याप्रमाणे मी शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत थांबून हातातलं काम संपवलं सुद्धा.

शनिवारी सकाळी सव्वा सात वाजता मी स्वारगेट बसस्थानकावर पोहोचलो. शनिवारी बसेसना गर्दी असते म्हणून मी आधिच रिजर्वेशन केलं होतं. पण आज जास्त गर्दी नव्हती. रिजर्वेशन करायचं दुसरं कारण म्हणजे बसच्या बाबतीतलं माझं फुटकं नशीब. जेव्हा जेव्हा मी बसने प्रवास करतो तेव्हा एकतर मला बसायला जागा तरी मिळत नाही किंवा जागा मिळालीच तर अगदि मागची सीट मिळते. पण हे फक्त माझ्याच बाबतित होतं असं नाही ,

तर आमच्या घरातल्या सगळ्यांचच म्हणजेच माझ्या आई, बाबा आणि भावाचं सुद्धा नशीब माझ्यासारखंच फुटकं आहे.

हा, तर मी बसची वाट पाहत उभा होतो. पंधरा ते वीस मिनिटातच बस आली. पण तेवढ्या वेळात सुद्धा माझ्या मनात कितीतरी विचार येउन गेले. आई - बाबा कसे असतील, घरी गेल्यावर आईला कोणते पदार्थ बनवायला सांगायचे, जवळपास कुठे फिरायला जायचं, आई नेहमीप्रमाणे व्यायाम करतोस का? असं विचारणार आणि पोट कमी करण्याचा सल्ला देणार तर यावेळी काय सांगायचं हे आणि यासारखे बरेच विचार. पण मला खुप छान वाटत होतं. तब्बल तीन महिन्यांनंतर मी घरी चाललो होतो. इतक्या दिवसांनंतर मी आईच्याहातचं खाणार होतो. आईच्या हातच्या जेवणाची सर बाहेरच्या जेवणाला नाही येत. तुम्ही कितीही महागड्या हॉटेलात जावा पण तिथलं खाउन ते समाधान नाही मिळत जे आईने बनवलेला वरण भात किंवा पिठलं भाकरी खाल्यावर मिळतं.

मी बसमध्ये चढलो आणि माझ्या जागेवर जाउन बसलो. माझ्या शेजारच्या सीटवर कोणीच बसू नये अशी माझी इच्छा होती पण पुढची सीट असल्यामुळे ते काही शक्य नव्हतं. मी खिशातून मोबाईल काढला आणि हेडफोन कानाला लावून गाणी ऐकत बसलो. तेवढ्यात एक गृहस्थ तेथे आले आणि माझ्या शेजारच्या सीटवर बसले. तो माणूस चांगलाच स्थुल होता आणि जणूकाही घरीच खुर्चीवर बसल्याप्रमाणे निवांत जागा व्यापून बसला. मी तर पार चेंगरून गेलो. हातात कसाबसा मोबईल धरून मी अवघडून बसलो होतो.

बस आता स्वारगेटवरून निघाली. अजुनही मी तसाच अंग चोरन बसलो होतो. मनातल्या मनात त्या जाड्या माणसाला आणि स्वतःच्या नशिबाला शिव्या देत होतो. तेवढयात तो माणूस माझ्याकडे वळला आणि भांड्यांवर अक्षरं कोरताना जसा आवाज येतो तशा आवाजात मला म्हणाला, "दादा, तुम्ही माझ्या जागेवर बसाल का? त्याचं काय आहे मला जरा मळमळतय

त्यामुळे खिडकीपाशी बसलेलं बरं."मला दुसरा पर्यायच नव्हता. नाहीतर माझा पिवळ्या रंगाचा लकी शर्ट खराब झाला असता. त्या माणसाला मनातल्यामनात चार शिव्या दिल्या आणि मी तिथुन उठलो.

आता माझ्यासाठी केवळ बूड टेकण्यापुरतीच जागा राहिली होती. यापेक्षा मागची सीट मिळाली असती तरी चाललं असतं. मग माझ्या मनात विचार आला, त्या माणसाला शिव्या देउन तरी काय फायदा आहे. त्याची तरी काय चूक आहे. त्याचा देहच तेवढा आहे त्याला तो तरी काय करणार. पण मग मला आईचे शब्द आठवले, 'काय व्यायाम करतोस की नाही? पोट कधी कमी होणार तुझं.' मी तरी कुठं अगदी बारीक आहे आणि आई सांगते तसा जर मी व्यायाम नाही केला तर काही वर्षात माझीही अवस्था त्या जाड माणसासारखी होईल असा विचार माझ्या मनाला स्पर्शून गेला आणि त्या नुसत्या विचारानेच माझ्या अंगावर काटा आला आणि माझ्या नकळत माझी नजर माझ्या वाढलेल्या पोटाकडे गेली. उद्यापासूनच व्यायाम सुरु करायचा असं मी मनोमन ठरवलं.

आज पहिल्यांदा पिवळ्या रंगाने मला दगा दिला होता. पिवळा रंग आपल्यासाठी लकी आहे असा आत्तापर्यंत माझा समज होता आणि तसा अनुभव सुद्धा मला कित्येकदा आला होता. मी जॉबसाठी इंटरव्यूव्हला जाताना सुद्धा पिवळ्या रंगाचाच शर्ट घातला होता आणि मला जॉब मिळालापण. बहुतेक आजचा दिवसच माझ्यासाठी खराब होता.

आता गाडी कात्रज जवळ पोहोचली. अजूनही मी अस्वस्थ होतो.

निर्विकार चेहेऱ्याचा कंडक्टर आला आणि "कुठे जायचंय?" असं त्याने मला विचारलं. मी मोबाईलमधून इ तिकीट कंडक्टरला दाखवलं.

कंडक्टरने त्या जाड्या माणसाला विचारलं तसा तो त्याच्या त्या भांडयांवर कोरताना होणाऱ्या आवाजाप्रमाणे विचित्र आवाजात बोलला, "एक सातारचं तिकिट द्या." कंडक्टर

निर्विकारपणे म्हणाला, "गाडी साताऱ्यात जात नाही. तुम्हांला हायवेला उतरायला लागेल." हे ऐकून मी इतका खुश झालो की तो जाडा माणूस काही बोलायच्या आत जागेवरून उठलो.

कंडक्टर पुन्हा म्हणाला, "मागून साताराची गाडी येतेय. हवंतर तुम्ही इथे उतरून त्या गाडीत चढू शकता."

तसा तो माणूस उठला. कंडक्टरने बस थांबवली. तो माणूस बसमधून बाहेर पडला. मी सुटकेचा निश्वास टाकला आणि निवांत खिडकीपाशी जाउन बसलो. माझ्या चेहेऱ्यावरचा आनंद पाहून तो निर्विकार चेहेऱ्याचा कंडक्टर सुद्धा पहिल्यांदाच हसला आणि मी माझ्या पिवळ्या रंगाच्या शर्ट वरुन एकदा नजर फिरवली.

x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x

# इच्छा

सदाशिवराव आपल्या दोन खोल्यांच्या घरात नेहमीप्रमाणे महाभारताचं पारायण करत होते. आता शेवट आला होता. कृष्णाने अश्वत्थाम्याला शाप दिला. हे वाचताना खरंच अजूनही अश्वत्थामा जिवंत असेल का? असा प्रश्न त्यांना कायम पडायचा. सत्तरी ओलांडलेल्या सदाशिवरावांची जिवंत असेपर्यंत एकदातरी अश्वत्थामाला पहायची तीव्र इच्छा होती. सदाशिवराव पुढे वाचू लागले पण त्यांचं मन अजूनही अश्वत्थाम्यावरच रेंगाळलं होतं. कपाळावर वस्त्र बांधलेल्या, हातात भांडं घेऊन तेल आणि पीठ मागत फिरणाऱ्या अश्वत्थाम्याची उंचीपुरी, बळकट मूर्ती त्यांच्या मनःपटलावर उमटली. त्यांनी परत एकदा वाचायचा प्रयत्न केला पण त्यांचं लक्ष आता वाचनात लागेना. अश्वत्थामा त्यांच्या मनातून जात नव्हता. सदाशिवरावांनी ग्रंथ मिटला व कपाटात ठेवला. त्यांनी चश्मा काढून टेबलावर ठेवला व ते गादीवर आडवे झाले. थोड्याच वेळात त्यांना झोप लागली.

दरवाजाची बेल वाजली वा त्या आवाजामुळे सदाशिवरावांना जाग आली. डोळे चोळतच सदाशिवरावांनी दरवाजा उघडला. डोळ्यांवर चश्मा नसल्यामुळे सदशिवरावांना अस्पष्ट दिसत होतं. समोर एक भिकारी हातात भांडं घेऊन उभा होता. तो चांगलाच उंच वाटत होता पण तितकाच कृश दिसत होता. त्याच्या कपाळावर एक मळकट कापडाची पट्टी बांधली होती. हा अश्वत्थामा असेल का? सदाशिवरावांच्या मनात विचार आला. कारण त्या भिकाऱ्याच्या कपाळावर पट्टी बांधली होती तसेच तो चांगलाच उंच होता. त्याचं शरीर मात्र अतिशय कृश होतं. पण इतकी वर्ष चालून कदाचित तो अशक्त झाला असावा असं सदशिवरावांना वाटलं. आता तो भिकारी साक्षात अश्वत्थामा आहे अशी त्यांची खात्री पटली. सदशिवरावांचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. त्यांना काहीच सुचत नव्हत. बराचवेळ ते नुसते त्या

भिकारयाकडे पाहत होते. त्यांच्या नजरेत एकाचवेळी आनंद आणि कुतूहल दिसत होत. त्यांच्या तोंडून शब्दच निघत नव्हते. शेवटी कंटाळून तो भिकारी तिथून निघाला. है पाहताच सदाशिवराव ओरडले. 'थांब' एवढा एकच शब्द त्यांच्या तोंडून बाहेर आला. तसा तो भिकारी परत आला. सदाशिवराव आत गेले व एका हातात भांडं व दुसऱ्या हातात तेलाची बाटली घेऊन बाहेर आले. त्यांनी त्या भिकारयाच्या हातातील भांड्यात पीठ टाकले व त्यातच बाटलीतील थोडे तेल ओतले. सदाशिवराव चक्क त्या भिकाऱ्याच्या पाया पडले. भिकारयाने काय वेडा म्हातारा आहे अशा नजरेने सदाशिवरावांकडे पाहिले व त्रासिक चेहेरा करून तो तिथून पुढे निघाला.

सदाशिवरावांनी दरवाजाला आतून कडी लावली व ते आत खुर्चीवर बसले. त्यांच्या चेहेरयावरचा आनंद अजूनही कमी झाला नव्हता. खूप वर्षांपासूनची त्यांची अश्वथाम्याला पाहण्याची इच्छा आज पूर्ण झाली होती. आता ते त्यांच्या मुलांना, नातेवाईकांना, शेजारी पाजाऱ्यांना, सर्वांनाच अश्वथाम्याने दिलेल्या दर्शनाचा प्रसंग रंगवून सांगणार होते. ते खुर्चीवरून उठले व टेलीफोनवरून त्यांच्या मुलाचा नंबर लावला. मुलाने फोन उचलला. पण सदाशिवराव काही बोलायच्या आत त्याने “बाबा मी मिटिंगमध्ये आहे. तुम्हाला नंतर कॉल करतो." एवढे बोलून फोन ठेवला.

सदाशिवरावांना स्वस्थ बसवेना. त्यांनी चश्मा घातला, दरवाजामागे अडकवलेला शर्ट चढवला व ते घराबाहेर आले. बाहेर काही अंतरावर एका घरासमोर बरीच गर्दी जमली होती. सदाशिवराव गर्दीच्या दिशेने चालू लागले. तिथे पोहोचल्यावर त्यांनी घोळक्यातून आत शिरायचा प्रयत्न केला पण लोक तिथून हलत नव्हते. शेवटी बऱ्याच वेळानंतर गर्दी थोडी कमी झाली आणि सदशिवरावांना जागा मिळाली. पण समोरचे दृश्य पाहून सदाशिवरावांना धक्काच बसला. थोड्या वेळापूर्वी त्यांना दर्शन दिलेला अश्वत्थामा म्हणजेच तो भिकारी निपचित पडला होता. त्याचे डोळे खोबणीतून बाहेर आले होते वा तोंड उघडलेलं होतं. सदाशिवरावांच्या संपूर्ण

शरीराला कंप सुटला. आता त्यांना तिथे नीट उभही राहता येईना आणि शक्तिपात होऊन ते खाली कोसळले. जवळच उभ्या असलेल्या माणसाने त्यांना पाहिले व सारी गर्दी सदाशिवरावांकडे वळली. दोन जणांनी त्यांना उचलले व त्यांच्या घरी आणले. शेजारीच राहणारा गजानन घरून कांदा घेऊन आला व त्याने कापलेला कांदा सदाशिवरावांच्या नाकाला लावला. कांद्याच्या उग्र वासाने सदाशिवराव शुद्धीवर आले. गजानन आतून पाण्याचा पेला घेऊन आला. पाणी पिल्यावर सदाशिवरावांना थोडं हायसं वाटलं. आता सदाशिवरावांना परत शुद्धीवर आलेलं पाहताच त्यांच्या घरासमोरची गर्दी परत त्या भिकाऱ्याकडे वळली. गजाननने आतून दरवाजा लावून घेतला. सदाशिवराव अजूनही काही बोलत नव्हते. गजाननने त्यांना तो भिकारी कसा मेला ते सांगितले.

तो भिकारी एक बहिरूपी होता. तो रोज वेगवेगळ रूप घेऊन दारोदारी जाऊन भीक मागायचा. तो कधी पोलिसाचं तर कधी डाकुचं रूप घ्यायचा. काही वेळा तर तो अगदी रावणासारख्या पौराणिक पात्रांच देखील रूप घेऊन फिरायचा. आज त्याने अश्वथाम्याचं रूप घेतलं होतं. सदाशिवरावांच्या घरापासून थोडं पुढे गेल्यावर एका लाईटच्या खांबावरून खाली आलेल्या उघड्या वायरवर त्याचा पाय पडला. त्याचे पाय अनवाणी असल्यामुळे त्या वायरमधून जाणाऱ्या विजेचा त्याला शॉक लागला. जवळच उभ्या असलेल्या काही लोकांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा जागेवरच मृत्यू झाला.

निराश मनाने सदाशिवराव ऐकत होते. थोड्यावेळाने काळजी घ्या आणि काही लागलं तर मला सांगा एवढे सांगून गजानन आपल्या घरी गेला. आज घडलेल्या या नाट्यमय घटनांचा विचार करत सदाशिवराव गादीवर पडले होते. भगवान श्रीकृष्णाच्या शापामुळे दारोदारी भटकणारा अश्वत्थामा, अश्वत्थाम्याचं रूप घेऊन दारात आलेला भिकारी, त्या भिकाऱ्याचा झालेला दुर्दैवी मृत्यू या सगळ्याचा विचार करता करता आपली अश्वत्थाम्याला पहायची इच्छा

अपूर्णच राहिली याची सदाशिवरावांना जाणीव झाली व प्रत्यक्षात नाही तर कदाचित स्वप्नात तरी अश्वत्थामा आपल्याला दर्शन देईल या आशेने ते झोपी गेले.

x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x x

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. निरंजन कुलकर्णी यांचं ई साहित्यवरचं हे चवथं पुस्तक.** यापुर्वीची त्यांची तिन्ही पुस्तके वाचकांना आवडली. गूढरम्य कथाबीजांच्या आधाराने ते तितकेच सुंदर वर्णन करून डोळ्यांसमोर एक ताजेतवाने, मोहक चित्र उभे करतात. नव्या पिढीला अपील करणारी त्यांची कथानके असतात. आणि सहज सुंदर शब्दरचना व ओघवती शैली यांमुळे त्यांचा एक फ़ॅनवर्ग निर्माण होत आहे. हे चवथे पुस्तक वाचकांना नक्की आवडेल. आपल्याकडून येणाऱ्या प्रतिसादांच्या आधारे ते अत्यंत मेहनतीने आपल्या लेखनाचा कस वाढवत नेत आहेत. लवकरच त्यांची गणना मराठीतील प्रमुख लेखकांमध्ये होईल असा आम्हाला विश्वास आहे. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे.

ई साहित्य प्रतिष्ठान

नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, निरंजन कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

आमेन

सुनीळ सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान